दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२७८ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, रविवार, २४ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## शिंदे गटाची मागणी; निवडणुकीपासून कलंकित अन गुन्हे दाखल असलेल्या नेत्यांना दूर ठेवा

■ ठाणे, विशाल कारंडे :

बलात्कार, भ्रष्टाचार, फसवणूक पासून अनेक गुन्हे दाखल असलेल्या दाखलेबाज व चारित्र्यहीन स्वयंघोषित नेत्यास भाजपाने लोकसभा निवडणूक प्रचारा पासून दूर ठेवावे अशी मागणी शिवसेना शिंदे गटाने माजी आमदार नरेंद्र मेहतांचा नामोल्लेख टाळत मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री आदींना केली आहे . मीरा भाईंदर शिवसेना जिल्हाप्रमुख राजू भोईर , महिला जिल्हा संघटक निशा नार्वेकर सह विधानसभा मतदार संघ क्षत्रप्रमुख विक्रमप्रताप सिंह , सचिन मांजरेकर , पूजा आमगावकर यांनी लेखी पत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , भाजपा नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , आमदार प्रताप सरनाईक यांना दिले आहे . नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी सर्वच उत्सुक असून राज्यातही शिवसेना - भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षांची महायुती ४५ हुन अधिक जागा जिंकण्याचा निर्धार करून कामाला लागली आहे. यात आपल्या ठाणे लोकसभा मतदारसंघातून यावेळेस महायुतीचाच खासदार निवडून यावा यासाठी शिवसैनिक कामाला लागले आहोत. युतीचे वरिष्ठ नेते ठाणे लोकसभेत जो उमेदवार देतील त्याला विजयी करण्याची जबाबदारी आमची राहील. लोकसभेच्या जागेबाबत वरिष्ठ नेतृत्व निर्णय घेण्यास सक्षम असताना मीरा भाईंदर मधील वादग्रस्त कलंकीत नेता जाणूनबुजून महायुतीत तणाव निर्माण करणारी आणि जनतेत विरोधाचे वातावरण तयार करणारी वक्तव्ये करीत आहे. तसेच शिवसेना पक्ष व नेत्यांवर बिनबुडाचे आरोप करीत असल्याने पत्र लिहिल्याचे कारण नमूद केले आहे . भाजपा माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी आ. सरनाईक यांच्यावर



नामोल्लेख टाळत आरोप - टीका करत शिवसेना उमेदवाराचे काम करणार नाही अशी भूमिका मांडली होती . त्यावरून शिवसेना शिंदे गटाने हे पत्र दिले आहे . कलंकित , भ्रष्टाचाराचे अनेक आरोप असलेला, विविध गंभीर गुन्हे दाखल असलेला, चारित्र्यहीन असा एक वादग्रस्त नेता माध्यमांना मुलाखती देत आहे आणि महायुतीत वाद निर्माण करत आहे. भाजपच्या मीरा भाईंदर मधील या नेत्याला २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने घरी बसवले. पण स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी , स्वतःच्या वैयक्तिक लालसेपोटी मीरा भाईदरमधील भाजप पक्ष हा आपली खासगी मालमत्ता असल्यासारखी वक्तव्ये हा नेता करीत असल्याने सगळे शिवसैनिक आणि भाजपचे जुने कार्यकर्तेही नाराज झाले आहेत. युतीधर्म म्हणून अजूनही आम्ही पदाधिकाऱ्यांनी कोणतेही वक्तव्ये माध्यमांच्या समोर केली नाहीत पण आता अती होत चालले आहे. या वादग्रस्त कलंकित नेत्याला भाजपच्या प्रदेश नेतृत्वाने आवर घालावा व अशा चारित्र्यहीन लोकांना लोकसभा निवडणुकीच्या प्रचारापासून दूर ठेवावे. जेणेकरून ऐन प्रचाराच्या वेळी कोणताही वाद महायुतीमध्ये समनव्य ठेवताना होणार नाही. स्वतःच्या व्यक्तिगत फायद्यासाठी महायुतीत मिठाचा खडा टाकणे म्हणजे नरेंद्र मोदीजी यांनाच विरोध करण्यासारखे आहे. मोदीजी ज्या पक्षाचे सर्वोच्च नेते आहेत त्यांच्याच भाजप पक्षाच्या बॅनरखाली असलेल्या या वादग्रस्त नेत्याकडून अशी चुकीची विधाने होत असल्याने जनतेतही याबाबत उलट सुलट चर्चा होत आहे. अशा वादग्रस्त , कलंकित , आरोपांनी बरबटलेल्या माणसामुळे मीरा भाईंदरचे शिवसैनिक संतप्त झाले आहेत. आज असा वादग्रस्त माणूस भाजपचे नेतृत्व करीत असल्याने भाजपच्या मूळकार्यकर्त्यांचे खच्चीकरण झालेले आहेच पण आता तो जर आमच्या वाट्याला येत असेल तर फारकाळ आम्ही संयम ठेऊ शकत नाही असा इशारा देखील शिंदे गटाने पत्रात दिला आहे .






## अखेर आढळराव पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

■पुणे, अभिजीत येरुल्लू :


लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगतोय.. शिरूर लोकसभेमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार आणि विद्यमान खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांना रोखण्यासाठी महायुतीकडून पुन्हा एकदा २०१९ चा उमेदवार रिंगणात उतरवणार असल्याची शक्यता आहे.. तर महायुतीकडून कोण लढणार हा सस्पेन्स आजवर कायम होता त्याला आता फुल स्टॉप लागण्याची शक्यता आहे. शिवसेना शिंदे गटामध्ये असणारे शिवाजीराव आढळराव पाटील हेच महायुतीकडून लढणार असल्याचं जवळपास निश्चित झालं आहे. आज त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि शिरूर लोकसभेतील



राष्ट्रवादीचे आमदार उपस्थित होते. २६ मार्च रोजी मतदारसंघात मोठा मेळावा घेत ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याचं निश्चित झाल आहे.शिरूर लोकसभा मतदारसंघाची जागा महायुतीमध्ये अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसकडे असणार आहे. तीन वेळा शिरूरचे खासदार राहिलेले शिवाजीराव आढळराव पाटील सद्या शिवसेनेमध्ये आहेत. त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घेत उमेदवारी दिली जाणार असल्याचं आता निश्चित झाल आहे. आज अजित पवार यांची भेट घेतली. यावेळी २६ मार्च रोजी मतदारसंघात मोठा मेळावा घेत त्यांचा पक्षप्रवेश होणार आहे.

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना आढळराव पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली असून मतदारसंघातील जनतेच्या साक्षीने मंगळवारी मेळावा पार पडणार आहे. काही नसताना पहिली निवडणूक ३० हजारांच्या मताधिक्याने तर दुसरी १ लाख ८० हजाराने तर तिसरी ३ लाख ३ हजारांनी विजय झाला. यंदाच्या निवडणुकीतील विजय त्यापेक्षा अधिक मताधिक्याने होईल असा विश्वास आढळराव यांनी व्यक्त केलाय.

## सायन रेल्वे पुलावर २८ मार्च पासून हातोडा; वाहतूक व्यवस्थेवर होणार परिणाम



■मुंबई, नितीन देवळेकर :

पूर्व आणि पश्चिम मुंबईला जोडणाऱ्या सायन येथील पुलाचे पाडकाम २८ मार्चपासून सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. रेल्वे प्रशासनाने मात्र अद्याप त्यास दुजोरा दिलेला नसला, तरी परीक्षांनंतर हा पूल पाडला जाणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती. दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू असल्याने या काळात पूल बंद केला, तर ते अडचणीचे ठरेल, याकडे स्थानिकांनी लक्ष वेधले होते, तसेच या संदर्भात वाहतूक पोलिसांनीही रेल्वेला विनंती केली होती. त्यामुळे रेल्वे पुलाचे पाडकाम सुरू करण्यात आले नव्हते. २८ फेब्रुवारीच्या रात्रीपासून पूल बंद केला जाणार होता आणि त्यानंतर पुलाचे पाडकाम हाती घेतले जाणार होते. मात्र, लोकप्रतिनिधी आणि रेल्वे प्रशासनात झालेल्या बैठकीत या पुलाचे पाडकाम पुढे ढकलण्यात आले.

असा असेल नवीन पूल -

नवीन पूल हा सिंगल स्पॅन सेमी-थ्रू गर्डर्स ४९ मीटर लांबीचा आणि २९ मीटर रुंदीचा आरसीसी स्लॅब पद्धतीचा असेल.मुंबई आयआयटीने स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टमध्ये आताचा पूल तोडून टाकण्याची आणि स्टील गर्डर व आरसीसी स्लॅबसह जुन्या पुलाच्या जागी नव्या पुलाची शिफारस केली होती.

१९१२ मध्ये पुलाचे बांधकाम -

१) सायन रेल्वे पूल १९१२ मध्ये बांधण्यात आला आहे.

२) मध्य रेल्वेच्या पाचव्या आणि सहाव्या मार्गाच्या बांधकामासाठी हा पूल पाडून नवीन पूल बांधला जाणार आहे.

३) २४ महिन्यांत नवीन पूल बांधून पूर्ण केला जाईल.

४) महापालिका आणि रेल्वे एकत्रित यासाठी खर्च करेल.

## परदेशी नागरिकांना घर भाड्याने देणाऱ्या ११ घरमालकांवर तुळींज पोलिसांनी केले गुन्हे दाखल

■विरार, सचिन कदम :

परदेशी नागरिकांना पोलिसांच्या परवानगीशिवाय परस्पर घरे भाड्याने देणार्यांविरोधात पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. नालासोपारा मधील तुळींज पोलिसांनी अशा प्रकरणात ११ घरमालकांविरोधात गुन्हे दाखल करून अटक केली आहे. वसई विरार शहरातम मोठ्या प्रमाणावर नागरिकीकरण होत आहे. विविध राज्यातील तसेच परदेशी नागरिक देखील विविध कारणांसाठी शहरात वास्तव्यासाठी येत आहेत. परदेशी नागरिकांमध्ये नायजेरीयन, बांग्लादेशी आणि इतर आफ्रिकन देशातील नागरिकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. अनेक गुन्ह्यांच्या प्रकरणाता परदेशी नागरिकांचा सहभाग आढळून आला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ते देशात प्रवेश करून वास्तव्य करत असतात. त्यामुळे घरे भाड्याने देताना पोलिसांचा ना हरकत दाखला घेणे बंधनकारक करण्यात आले होते.



याशिवाय परदेशी नागरिकांना घरे देताना ह्यसीह्न फॉर्म भरून पोलिसांचा ना हरकत दाखला घ्यावा लागत होता. मात्र अनेक परदेशी नागरिक पोलिसांच्या अशा दाखल्याशिवाय रहात असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे अशा परदेशी नागरिकांना घरे देर्णायांविरोधातही पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. तुळींज पोलिसांनी अशा प्रकरणात एकूण ११ घरमालकांविरोधात कारवाई केली आहे. त्यांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांच्यावर दोषारोपत्र दाखल केल्याने त्याना शिक्षा आणि दंड होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस आयुक्तांनी मनाई आदेश लागू केले आहेत त्यानुसार घरात भाडेतत्वावर, तसेच हॉटेल, लॉजेस, क्लब, गेस्ट हाऊस इत्यादी ठिकाणी परदेशी नागरीक आल्यास त्यांची माहिती विहित प्रपत्रामध्ये २४ तासांच्या आत पोलिसांना देणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातूनही ते महत्वाचे आहे, असे पोलीस अधिकार्यांनी सांगितले. परदेशी नागरिकांनाच अमली पदार्थाच्या व्यवहारातील वाढत्या सहभागामुळे ही कारवाई करण्यात येत आहे. यापुढे देखील ही कारवाई अधिक तीव्र करण्यात येईल असे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी सांगितले. विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ अन्वये कोणत्याही परदेशी नागरिकांना घर भाड्याने देताना २४ तासांच्या आत पोलिसांना कळवणं बंधनकारक असतं. त्यामुळे अशी माहिती दडवून ठेवर्णायांना भारतीय दंडविधान संहितेच्या कलम १८८, रिपोर्ट टू पोलीस ऑर्डर १९७१ च्या नियम २ अन्वये, तसेच विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ च्या कलम १४ अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे.

## सीबीएसईने देशातील २० शाळांची मान्यता केली रद्द; पुणे, ठाण्यातील शाळेचा समावेश




■मुंबई, दिगंबर जाधव :

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) शाळांमध्ये डमी विद्यार्थी दाखवणे, वाटेल तसा आर्थिक कारभार करणे, कोणत्याही नोंदी न ठेवणाऱ्या देशातील २० शाळांची तपासणी करून सीबीएसईने थेट त्यांची मान्यताच काढून घेण्याचा निर्णय घेतला आहे. मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमध्ये राज्यातील दोन शाळांचा समोवश आहे. त्यात ठाण्यातील राहुल इंटरनॅशनल स्कूल आणि पुण्यातील पायोनिर पब्लिक स्कूल या दोन शाळांचा समावेश आहे. मान्यता काढून घेतलेल्या शाळांमध्ये अनेक प्रकारचे गैरप्रकार सुरू असल्याची बाब सीबीएसईला एका तपासणीत आढळून आली होती. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

देशात मोठ्या प्रमाणात सीबीएसईच्या शाळांची संख्या वाढत असून अनेक शाळा एकदा संलग्नता आणि मान्यता घेतल्यानंतर मंडळाकडे कोणताही संबंध ठेवत नसल्याने मंडळाने काही शाळांची तपासणी केली होती. त्यात या शाळा मंडळाने दिलेल्या निकषांचे, परीक्षा आणि त्यासाठीच्या नियमांचे पालन करतात की नाही हे तपासले होते. त्यात मंडळाला या शाळांमध्ये परीक्षेच्या काळात थेट डमी विद्यार्थी बसवून परीक्षा देत असल्याची बाब निदर्शनाला आली होती. तसेच अपात्र ठरविण्यात आलेले विद्यार्थीही यात होते.

## मुंबईतील खड्ड्यांवर दंडाचा मुलामा, कंत्राटदारावर कारवाईचे महापालिकेचे नियोजन

■मुंबई, विशाल पाटील :

मुंबईतील रस्त्यांवरील खड्डे, हा कायमच चचेर्चा विषय राहिला आहे. पावसाळ्यात तर खड्ड्यांमुळे रस्ते अगदीच अवघड होऊन जातात. विविध यंत्रणांकडून खड्डेमुक्तीसाठी विविध उपाययोजना राबवल्या जात असल्या, तरी हा प्रश्न दर पावसाळ्यात उभा राहतोच; परंतु आता सुकर रस्तेप्रवासासाठी मुंबई महापालिकेने दंडाचा बडगा उगारण्याचे ठरवले आहे. हमी कालावधीत नवी रस्त्यांवर खड्डे पडल्यास कंत्राटदाराला दंड ठोठावण्याची तरतूद करण्याचे नियोजन प्रशासनाकडून केले जात आहे. आगामी काळातील रस्तेकामांच्या कंत्राटांमध्ये या अटीचा समावेश करण्याचा प्रयत्न आहे. यामुळे रस्ते खड्डेमुक्त होतील, असा दावा महापालिकेने केला आहे. मुंबई महापालिकेच्या रस्ते विभागाकडून पावसाळ्याआधी मे महिन्यापासूनच



खड्डे बुजवण्याच्या कामाला सुरुवात केली जाते. सप्टेंबरपर्यंत हे काम सुरू असते. मात्र खड्ड्यांचे प्रमाण काही केल्या कमी होत नाही. याबाबत उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला फटकारले होते. खड्डे युद्धपातळीवर बुजवण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जुलै २०२३ मध्ये मुंबई महापालिकेला दिले होते. यानंतर रस्त्यांची दिवसा पाहणी आणि लागलीच रात्री खड्डे बुजवणे, अशी मोहीमच पालिकेने हाती घेतली होती. प्रत्येक विभागस्तरावर सहायक आयुक्तांची खड्डे बुजवण्यासाठीच्या कामाचे समन्वय अधिकारी म्हणूनही नेमणूक केली होती. शिवाय रस्ते काँक्रिटीकरणाचे काम हाती घेण्यात आले. मात्र दरवर्षी खड्ड्यांना सामोरे जावे लागते. मुंबईत दोन हजार ५० किमीचे रस्ते असून, यापैकी ५० टक्क्यांहून अधिक रस्त्यांचे सिमेंट-काँक्रिटीकरण झाले आहे. सुमारे ४०० किमी रस्त्यांची कामेही केली जात आहेत. आगामी काळात होणाऱ्या रस्तेकामांनंतर रस्त्यांवर खड्डे पडू नयेत आणि कंत्राटदारांना जरब बसावी, यासाठी दंड आकारण्याची तरतूद केली जाणार आहे, अशी माहिती महापालिकेतील सूत्रांनी दिली. सध्या सिमेंट-काँक्रिटीकरणाच्या रस्त्यांसाठी पाच वर्षे आणि डांबरी रस्त्यांसाठी तीन वर्षांचा हमी कालावधी आहे. यात रस्त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी कंत्राटदारावरच असून, दंडाची तरतूद मात्र नाही. त्यामुळे तशी तरतूद महापालिकेकडून केली जाणार आहे, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने स्पष्ट केले. मुंबईतील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यासाठी मास्टिक सरफेस तंत्रज्ञानाचाच वापर करण्यावर भर आहे, अशी माहिती देण्यात आली. यामुळे खड्डे बुजवताना रस्ता पूर्णपणे नवीन होणार आहे. १२ इंचापेक्षाही मोठा खड्डा असल्यास तो कोल्डमिक्स तंत्रज्ञानाऐवजी मास्टिक सरफेसने बुजवला जाणार आहे. सध्या खड्डे बुजवण्यासाठी महापालिकेकडून नवे कंत्राट दिले जाते.

## गावठी हातभट्टीच्या दारूची तस्करी करणाऱ्या दोघांना भाईंदर पोलीसांनी केली अटक

■भाईंदर, भावना जैन :

कायद्याने बंदी असलेल्या गावठी हातभट्टीच्या दारूची तस्करी भिवंडीतून भाईंदर मध्ये केली जात असल्याचे उघकीस आले असून भाईंदर पोलिसांनी ४०० लिटर गावठी हातभट्टी दारुसह दोघांना अटक केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालयातील अवैध धंद्यांवर व गुन्हेगारांवर आळा बसावा म्हणून आवश्यक कारवाईचे आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले आहेत . त्या अनुषंगाने रात्री भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथक हे गस्त घालत होते . त्यावेळी हवालदार के.पी. पवार यांना त्यांच्या खबरी मार्फत माहिती मिळाली कि , एका चंदेरी रंगाच्या गाडीतून गावठी हातभट्टीची दारू मोरवा गावा च्या दिशेने जाणार आहे . सहायक आयुक्त दीपाली खन्ना , वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुर्यकांत नाईकवाडी, पोलीस निरीक्षक विवेक सोनवणे व सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली



सहायक पोलीस निरीक्षक नरोटे सह गुन्हे प्रकटीकरण शाखेचे राजेश श्रीवास्तव, के. पी. पवार, के.आर. पवार, रामनाथ शिंदे, सुशिल पवार, संजय चव्हाण यांच्या पथकाने नेताजी सुभाषचंद्र बोस मैदाना जवळ सापळा रचला . १९ मार्चच्या मध्यरात्री चंदेरी रंगाची संशयित कार येताच तिला थांबवण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला . परंतु कार चालक कार पळवून नेण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी ती अडवली . पोलिसांनी कार चालका कडे चौकशी केली असता त्याने मच्छिंद्र लहु मढवी ( ४० ) रा. अंजुरगाव, भिवडी असे सांगितले . तर बाजूला बसलेल्याचे नाव सुरज सुनिल कोळी (२४ ) रा. अंजुरगाव, भिवडी असे होते .

## एसटीच्या ॲप आणि ऑनलाईन माध्यमातून आसनांचे आरक्षण होत नसल्याने केंद्रांवर रांगा

■ठाणे, रोहित जैसवाल :

होळी आणि धुलिवंदन निमित्ताने मुंबईत राहणारे कोकणवासिय त्यांच्या गावाला जाण्यासाठी निघाले आहेत. रेल्वेगाड्यांमधील गदीर्चा प्रवास टाळण्यासाठी अनेकजण राज्य परिवहन सेवेच्या (एसटी) बसगाड्यांमध्ये आसन आरक्षित करत प्रवास करत असतात. महामंडळाने त्यासाठी अँप आणि ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मागील अनेक दिवसांपासून अँप आणि ऑनलाईन माध्यमातून आसनाचे आरक्षण होत नसल्याने प्रवाशांना बस




आगारात जाऊन आरक्षण केंद्रावर रांगा लावाव्या लागत आहेत. काही प्रवाशांनी ॲप किंवा ऑनलाईन माध्यमातून तिकीट काढण्याचा प्रयत्न केला. त्यांचे पैसे कापले गेले. परंतु तिकीट मिळाली नाही. या प्रकारामुळे महामंडळाच्या कारभाराविषयी प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्ह्यात कोकणातील लाखो नागरिक वास्तव्य करतात. होळी आणि धुलिवंदनाच्या कालावधीत कोकणात विविध कार्यक्रमांचे आणि पालखी सोहळ्यांचे आयोजन केले जाते. त्यामुळे कोकणवासिय त्यांच्या गावाला जाण्यासाठी निघत असतात. रेल्वेगाड्यांमध्ये गर्दी असल्याने आरक्षण मिळत नसते. त्यामुळे प्रवाशांना एसटी महामंडळाच्या बसगाड्यांवर अवलंबून राहावे लागते. एसटी महामंडळाकडून देखील या कालावधीत अतिरिक्त बसगाड्यांची वाहतुक होत असते.

## मुंबई महानगरपालिकेचा इशारा; मालमत्ता कर न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांवर करणार कारवाई

■मुंबई,यश सावंत

निर्धारित कालावधीमध्ये करभरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या तसेच आर्थिक क्षमता असूनही मालमत्ता कर न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांना पालिकेकडून नोटीस बजावण्यात आली आहे. विहित मुदतीत त्यांनी करभरणा न केल्यास मुंबई पालिका अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधितांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई केली जाईल, असे या नोटिशीद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.



पालिकेच्या करनिर्धारण आणि संकलन खात्यातर्फे मुंबई शहर आणि उपनगरांमधील मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती तसेच आवाहन करण्यात येत आहे.

नागरिकांची ऐनवेळी गैरसोय होऊ नये यासाठी साप्ताहिक सुट्टी तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सर्व विभागांमध्ये कर भरण्याची सोय करण्यात आली आहे. काही मोठ्या थकबाकीदारांना वेळोवेळी सूचना देऊनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यामुळे अखेर पालिकेने नोटीस बजावल्या आहेत. नोटीसप्राप्त मालमत्ताधारकांनी पुढील कारवाई टाळण्यासाठी तत्काळ करभरणा करावा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

**'टॉप टेन' थकबाकीदारांची यादी**

१) एलएण्डटी स्कॉमी इंजिनीअरिंग (एफ उत्तर विभाग) - ८८ कोटी ६३ लाख ७८ हजार ६७९ रुपये

२) रघुवंशी मिल्स (जी दक्षिण विभाग) - ७१ कोटी २३ लाख ६५ हजार ८५२ रुपये

३) एचडीआयएल (एच पूर्व)- ५३ कोटी १२ लाख ३९ हजार ९५३ रुपये

४) पोपटलाल जमनालाल, सी ब्रिझ बिल्डिंग ६ ते १५ मजले (जी दक्षिण)- ४७ कोटी ९९ लाख ८४ हजार ७६६ रुपये

५) एचडीआयएल (के पूर्व) - ४४ कोटी ०५ लाख ५४ हजार ३५ रुपये

६) रघुवंशी मिल्स (जी दक्षिण विभाग) - १७ कोटी ८७ लाख ६१ हजार ५६५ रुपये

७) सुभदा गृहनिर्माण संस्था (जी दक्षिण)- १६ कोटी ८४ लाख ७५ हजार ७०० रुपये

८) नॉव्हेल्टी सिनेमा (डी विभाग)- १६ कोटी ०१ लाख ८० हजार ६३ रुपये

९) ओमकार डेव्हलपर्स प्रा. लि. (जी दक्षिण विभाग)- १२ कोटी २१ लाख ३२ हजार १७३ रुपये

१०) गोल्डन टोबॅको कंपनी प्रा. लि (के दक्षिण विभाग)- ०८ कोटी ६७ लाख ८१ हजार ४८८ रुपये

# केशरी बटाटा-रवा कचोरी

**सारणसाठी साहित्य :** उकडून मॅश केलेले बटाटे १५० ग्रॅम, तिखट, आम्चूर पावडर, वाटलेली हिरवी मिरची, चाट मसाला, आल्याची पेस्ट, शोप जाडसर वाटलेली, मीठ चवीनुसार.

**आवरणासाठी साहित्य :** बारीक रवा २ कप, मैदा १ कप, तेल २ चमचे, मीठ १/२ चमचा, चिमूट भर केशरी रंग, थोडंसं दूध कणीक मळण्यासाठी, तळण्यासाठी तेल.



**कृती :** सर्वप्रथम मैदा, मीठ, रंग, तेल व दूध घालून कणीक मळून घ्यावी. बटाट्यात सर्व मसाले घालून मिश्रण तयार करावे. कणकेचे लहान लहान गोळे करून त्यात तयार केलेले बटाट्याचे सारण भरून कचोरीचा आकार द्यावा. तेल गरम करून मध्यम आचेवर सर्व कचोरी सोनेरी होईस्तोवर तळून घ्याव्या. गरमा गरम केशरी कचोरी हिरवी चटणी व टोमॅटो सॉस सोबत सर्व्ह करावी.

# केवळ एका उपायाने रोखू शकाल केसगळती



**आजकाल प्रदूषण, हार्मोन्समधील असंतुलन, मानसिक तणाव, आहाराद्वारे शरीराला मिळणारे अपुरे पोषण या आणि अशा अनेक कारणांनी केस गळतीची समस्या उद्भवण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. अगदी लहान वयातच केस गळतीच्या समस्येने त्रासलेले अनेक जण आपण नेहमी पाहत असतो. एकदा सुरू झालेली ही केस गळती अनेक महागडे शाम्पू, हेअर सिरम, हेअर स्पा, निरनिराळी हेअर ऑइल्स असे अनेक उपाय करूनही थांबत नाही. पण आता एक साधा आणि सोपा उपाय करून केसगळती थांबवण्यात यश येऊ शकते. हा उपाय करण्यासाठी कोणत्याही डॉक्टरकडे किंवा पार्लरमध्ये जाण्याची गरज नाही. या उपायासाठी वापरला जाणारा पदार्थ आपल्यापैकी बहुतेकांच्या घरामध्ये असतोच. हा पदार्थ म्हणजे कांदा.**



**वैज्ञानिकांच्या** म्हणण्यानुसार, कांद्यामध्ये डायटरी सल्फर असते. या सल्फरमध्ये असणारे ॲमिनो ॲसिड्स हा प्रथिनांचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. ही प्रथिने आणि विशेषतः केराटीन केसांच्या वाढीकरिता अतिशय फायदेशीर आहे. याशिवाय कांदा, पोटॅशियम, क, अ आणि ई जीवनसत्त्वाचे उत्तम स्त्रोत आहे. ही सर्व पोषक तत्त्वे केसगळती रोखून केसांच्या उत्तम वाढीस मदत करणारी आहेत.

कांद्याचा रस केसांना आणि केसांच्या मुळांशी लावल्यास त्यातील पोषक द्रव्ये केसांच्या मुळांमध्ये शोषली जातात. या पोषक द्रव्यांमुळे केसांची मुळे बळकट होऊन केसगळती कमी होते. कांद्याच्या रसामध्ये असलेले सल्फर केसांना मजबूत आणि दाट बनण्यास मदत करते. केसांना कांद्याचा रस लावण्यासाठी योग्य पद्धतीचा अवलंब केला जाणे गरजेचे असते.

कांद्याचा रस केसांना लावण्यासाठी सर्वप्रथम कांदा सोलून त्याचे लहान तुकडे करावेत. त्यानंतर हे तुकडे मिक्सरमधून वाटून घेऊन, त्याची जाडसर पेस्ट बनवून घ्यावी. एक पातळ कपडा घेऊन त्यामधून ही पेस्ट गाळून घेऊन रस काढून घ्यावा. हा रस नारळाच्या, बदामाच्या तेलामध्ये किंवा ऑलिव्ह ऑईलमध्ये मिसळावा. हे मिश्रण चांगले ढवळून घेऊन मग केसांना आणि केसांच्या मुळांशी लावून मसाज करावा. हे मिश्रण केसांमध्ये एक तास राहू देऊन मग शाम्पूने केस धुवून टाकावेत. हा उपाय

# पोटातील गॅस चारचौघांत मान खाली घालायला लावण्याआधीच 'या' घरगुती उपायांनी करा इलाज

**बाहेरील** औषधे घेतल्याने होणारा ॲसिडिटीचा त्रास आणि नाही घेतल्यास आजाराचा त्रास या पेचात पडायचे नसेल तर शरीरासाठी उपयुक्त आणि अगदी सहज उपलब्ध असणाऱ्या घरगुती उपायातून तुम्ही तुमच्या सर्व समस्या सोडवू शकाल. त्यासाठी फार लांब जाण्याचीसुद्धा गरज नाही. तुमच्या किचनमध्येच तुम्हाला हे उपाय दिसून येतील, कोणते? चला तर पाहुयात..

**ओवा**

पोटात मुरडा आल्यासारखे होत असेल तर ओवा हा तुमच्यासाठी नामी उपाय आहे. तळहातावर ओवा थोडा चोळून तुम्हाला तो खायचा आहे. ओव्याचा वास आणि दाताखाली आलेल्या ओव्याच्या रसामुळे तुम्हाला छान आराम मिळेल. तुम्हाला गॅस पटकन जायला हवा असेल तर तुम्ही ओवा चावताना त्यावर गरम पाणी प्या.

**गुळ खा**

दररोज जेवण झाल्यानंतर गुळ खाल्ल्याने अन्न पचनास आणि परिणामी संबंधित त्रासातून सुटका होते. गुळ तोंडात विरघळेपर्यंत चघळत राहावा ही प्रक्रिया जेवढी हळू होईल तेवढा त्याचा फायदा जास्त होईल.

**आल्याचा तुकडा**

अनेकदा ॲसिडिटी

हल्लीच्या धकाधकीच्या जीवनशैलीत अनेकांना खाण्या-पिण्याच्या वेळेवर लक्ष देणे जमत नाही, परिणामी शरीराचे सगळे कार्यचक्र बिघडून सतत हा ना तो आजार डोके वर काढत असतो. यातही पोटाचे विकार तर अगदी कॉमन आहेत, यातील एक प्रकार म्हणजे गॅस. जेव्हा अन्नपचन सुरळीत होत नाही आणि सतत बद्धकोष्ठता सतावत राहते त्यावेळेस पोटात ॲसिडिक गॅसेस तयार होतात, यामुळे वारंवार करपट ढेकर येणे, छातीत जळजळ होणे, पोटात मुरडा पडल्यासारखे वाटणे अशा अनेक समस्या उद्भवतात. हे गॅसेस अनेकदा गुदद्वारावाटे बाहेर पडतात, चारचौघांत असा काही प्रकार घडल्यास काय होते हे काही आम्ही तुम्हाला वेगळे सांगण्याची गरज नाही, पण अर्थात यावर गॅस दाबून ठेवणे हा काही उपाय नाही असे केल्यास त्रास वाढून गुदमरल्यासारखे होऊ शकते, पण मग यावर नेमके करायचे तरी काय?





आणि गॅस झाल्यावर मळमळल्यासारखे होते. त्यावर तुम्हाला आराम हवा असेल तर तुम्ही आल्याचा तुकडा चघळू शकता. आलं चघळून त्याचा चोथा होईपर्यंत तुम्ही त्याचा रस प्या. त्यावर जर तुम्ही थोडे कोमट पाणी प्यायलात तर तुम्हाला आराम मिळू शकेल. यातून बद्धकोष्टतेचा त्रासदेखील कमी होतो.

**बडीशेपचं पाणी**

१ कप उकळलेल्या पाण्यात १ चमचा बडीशेप मिसळून रातभर ठेवून द्या. सकाळी ते गाळून आणि त्यात एक चमचा मध मिसळून ते पाणी प्यावं. हे पाणी दिवसभरात ३ वेळा प्यायल्यानं पोट फुगणं आणि गॅसची समस्या दूर होते.

**लिंबू पाणी**

रोज गरम पाण्यातून लिंबाचा रस घेत असाल तर तुम्हाला पोटासंदर्भातील विकार होण्याची भीती बाळगायची काहीच गरज नाही. पोटातील गॅसेस हा असा त्रास आहे की ज्यात आपल्याला अनेकदा नेमकं काय होतंय हे कळत नाही. त्यामुळे जर का तुम्हाला पोटात अचानक दुखायला लागत असेल, पोट साफ होत नसेल, अपचन, ॲसिडिटी होत असेल तर तुम्हाला गॅसचा त्रास आहे हे समजून घ्या आणि मग त्यावर यातील उपाय आजमावून पाहू शकता, महत्त्वाचे म्हणजे उपायापेक्षा काळजी बरी असे आपल्याकडे मानले जाते, त्यामुळे तुमच्या जीवनशैलीला सुधारण्यावर सुद्धा लक्ष द्या.

# 'गुगल पे'वर येतोय का 'सर्व्हर डाऊन'चा इश्यू? मग करा हा उपाय

स्मार्ट राऊटिंग म्हणजे बँकेचा सर्व्हर डाऊन असल्यास गुगल पे अतिरिक्त यूपीआय आयडीच्या माध्यमातून आपोआप यूपीआय ट्रॅन्झॅक्शन करून घेतं. जाणून घ्या कसं इनेबल करायचं स्मार्ट राऊटिंग.

**गेल्या** काही वर्षांत यूपीआय अर्थात युनिफाईड पेमेंट इंटरफेसनं आपली पेमेंट करण्याची पद्धत बदलली आहे. बँक अकाऊंटशी लिंक असलेलं यूपीआय आपल्या ट्रॅन्झॅक्शनसाठी महत्त्वाचं माध्यम बनलं आहे. परंतु पेमेंट फेल झाल्यामुळे किंवा स्लो पेमेंटमुळे महत्त्वाच्या क्षणी गोंधळ उडतो. पेमेंट फेल्युअर टाळण्यासाठी स्मार्ट राऊटिंग हा एक मार्ग आहे. चला जाणून घेऊया स्मार्ट राऊटिंग म्हणजे काय आणि ते कसं ऑन करायचं?

**स्मार्ट राउटिंग म्हणजे काय?**

यूपीआय आयडी तुमच्या बँक अकाऊंटशी लिंक असल्यामुळे पेमेंट तुमच्या बँकेच्या सर्व्हरवरून होते. सर्व्हर ग्लीच, ओव्हर लोड किंवा इतर कारणांमुळे अनेकदा यूपीआय पेमेंट अपयशी होतात.

अशावेळी स्मार्ट राऊटिंग उपयुक्त ठरू शकतं. अतिरिक्त यूपीआय आयडी घेतल्यामुळे पेमेंट यशस्वी होण्याच्या शक्यता वाढतात, कारण यात दुसऱ्या यूपीआय आयडीचा वापर करून ट्रॅन्झॅक्शन तुमच्या अकाऊंटसाठी उपलब्ध असलेल्या दुसऱ्या सर्व्हरकडे पाठवलं जातं. असं समजा की, तुम्ही घरातून ऑफिसला कारने जात आहात आणि तुमच्याकडे चार रस्ते आहेत. दुर्दैवाने तुमच्या नेहमीच्या रस्त्यावर भरपूर ट्राफिक आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या बँकांचे अनेक यूपीआय आयडी असल्यामुळे तुमच्याकडे ट्रॅन्झॅक्शन करण्यासाठी अनेक मार्ग उपलब्ध होतात. जर एक यूपीआय आयडी रूट उपलब्ध नसल्यास यूपीआय ॲप आपोआप पर्यायी रूट निवडतो, त्यामुळे तुम्हाला अखंड सेवा मिळते.

**किती यूपीआय आयडी तुम्ही बनवू शकता**

युजर त्यांच्या बँक अकाऊंटवर जास्तीत जास्त चार यूपीआय आयडी बनवू शकतात. एकाच बँक अकाऊंटशी अनेक यूपीआय आयडी जोडून यूपीआय ट्रॅन्झॅक्शनच्या वेळी होणारा उशीर आणि फेल्युअर टाळता येतं.

**अतिरिक्त यूपीआय आयडी कसा बनवायचा**


नवीन अकाऊंट सेटअप करताना अतिरिक्त यूपीआय आयडी बनवण्याचा पर्याय असतो. अकाऊंट सेटअप केल्यावर देखील ही प्रोसेस करता येते. एखादं पेमेंट अडकल्यावर गुगल पे स्वतःहून अतिरिक्त यूपीआय आयडी जोडण्याचा पर्याय देतं. पुढील स्टेप्स फॉलो करून अतिरिक्त यूपीआय आयडी बनवता येईल.

■ गुगल पे ॲप ओपन करा ■ पेमेंट मेथड्समध्ये जा ■ तुमचं बँक अकाऊंट सिलेक्ट करा ■ त्यानंतर मॅनेज यूपीआय आयडी ■ इथे तुम्ही अतिरिक्त यूपीआय आयडी बनवू शकता

**नोट :** यूपीआय आयडी ॲक्टिव्हेट करण्यासाठी गुगल पे तुमच्या बँकेला एक एसएमएस पाठवतो, त्यामुळे एसएमएस चार्जेस लागू पडू शकतात.

**अतिरिक्त यूपीआय आयडीमुळे कोणता बदल होतो**

पेमेंट करण्याच्या पद्धतीत कोणताही बदल होत नाही. तुम्ही नेहमीप्रमाणे तुमच्या बँक अकाऊंटवरून




ट्रॅन्झॅक्शन करू शकता. जर तुमच्याकडे अतिरिक्त यूपीआय आयडी असेल तर एखादा रूट उपलब्ध नसल्यास तुमचं ट्रॅन्झॅक्शन पर्यायी यूपीआय आयडीवर पाठवलं जाईल. जर तुम्ही गुगल पेवरून लॉग आऊट केलं तर तुमचं बँक अकाऊंट इनॲक्टिव्ह होतं. पुन्हा लॉगइन केल्यावर तुम्हाला बँक अकाऊंट रिॲक्टिव्ह करावं लागेल. तेव्हा तुमचे अतिरिक्त यूपीआय आयडीदेखील रिॲक्टिव्ह होतील.

# होळीचे महत्त्व

शेवटचा मराठी महिना फाल्गुन आणि या महिन्यातील पौर्णिमेला येणारा सण म्हणजे 'होळी.' देशभरात विविध ठिकाणी हा सण साजरी करण्याची परंपरा, पद्धत वेगळी. पण तितकीच खास आणि आकर्षक आहे. पहिल्या दिवशी होलिका दहन होते आणि दुसऱ्या दिवशी एकमेकांवर रंग उडवून रंगांची होळी खेळली जाते ज्याला धुलिवंदन असे म्हटले जाते. होळीला शिमगाही म्हटले जाते. भगवान शंकराची लीला, याला शिव-शिमगासुद्धा म्हटले जाते. जसे प्रत्येक सणाची कहाणी आहे तसेच, होळी साजरी करण्या मागे देखील एक प्राचीन इतिहास आहे. हिरण्यकश्यपू नावाचा एक राजा होता जो स्वतःला खूप बलवान समजायचा. स्वतःच्या अहंकारामुळे तो देवतांची घृणा करायचा तसेच त्याला देवांचा देव भगवान विष्णूचे नाव ऐकणे देखील पसंत नव्हते. परंतु त्याचा पुत्र प्रल्हाद हा भगवान विष्णू चा परम भक्त होता. आणि हे हिरण्यकश्यपूला अजिबात पसंत नव्हते. तो वेगवेगळ्या प्रकारे त्याला घाबरवण्याचा प्रयत्न करत असे जेणे करून पुत्र प्रह्लाद भगवान विष्णूची उपासना करणे सोडून देईल. परंतु भक्त प्रह्लाद त्यांना न डगमगता त्याच्या भगवान विष्णूच्या भक्तीत लीन होत असे. ह्या सगळ्याला कंटाळून राजाने एक योजना बनवली, आणि त्यानुसार आपली बहीण होलिका जिला वरदान मिळाले होते कि ती आगीवर विजय प्राप्त करू शकते तसेच कोणतीही आग तिला



जाळू शकत नाही. राजाने होलिकेला भक्त प्रह्लादला घेऊन अग्नीच्या चितेवर बसण्यास सांगितले. प्रह्लाद आपल्या आत्यासोबत अग्नीच्या चितेवर बसला व भगवान विष्णूच्या नामस्मरणात लीन झाला आणि थोड्याच वेळात होलिका जळायला लागली आणि एक आकाशवाणी झाली आणि ज्यानुसार होलिकेला आठवलं की, तिला वरदानात असेही सांगितले होते कि ज्यावेळी ती तिच्या वरदानाचा दुरुपयोग करेल तेव्हा ती स्वतः जळून राख होईल. भक्त प्रह्लादाला अग्नी काहीही करू शकला नाही मात्र होलिका त्या अग्नीत जळून भस्म झाली. अशा प्रकारे त्या दिवशी लोकांनी उत्सव साजरा केला आणि तो दिवस होळी दहन म्हणून ओळखला जाऊ लागला. दुसऱ्या दिवशी रंगाने हा सण उत्सवात साजरा करू लागले. मराठी वर्षाचे सरते शेवटी फाल्गुन पौर्णिमेस साजरी होणारी होळी हुताशनी पौर्णिमा, शिमगा, या नावाने ओळखली जाते, अपप्रवृत्ती ना नष्ट करून त्यावर विजय मिळवल्याचा उत्सव साजरा करणारा हा सण खरेतर जुने जे जे वाईट असेल ते सोडून नव्याचे स्वागता साठी सिद्ध होण्याच हा सण. सृष्टी ही या काळात बदलत असते, वृक्ष आपली जीर्ण झालेली जुनी पाने त्यागून नवी धारण करीत असतात अनेक झाडांना मोहर आलेला असतो. फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंतच्या ५ झ्र ६ दिवसांत कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो. जाणून घेऊया होळी कशी साजरी केली जाते पूजाविधी, इतीहास, महत्व आणि मान्यता. काही वर्षांपूर्वीपर्यंत होळी जवळ आली की घरोघरी शेणाच्या चाकोल्या होत असलेल्या दिसायच्या त्या वेळी दोन होळ्या पेटायच्या. एक छोटी आणि एक मोठी. होळीच्या साधारण पंधरा-वीस दिवस आधी चाकोल्यांसाठी घरातील लहान मुले शेण गोळा करायची. या चाकोल्यांना मध्यभागी मोठे छिद्र केले जायचे. होळी येईपर्यंत या चाकोल्या खणखणीत वाळलेल्या असायच्या. मग नारळाच्या दोरीत त्या या चाकोल्या ओवून त्याची माळ तयार करायची. एका माळेत साधारण २०-२५ चाकोल्या असायच्या. आई- बहिणीसोबत लहान मुले होळीच्या पूजेला जायची त्यावेळी मग या चाकोल्यांच्या माळा होळीत टाकल्या जाचच्या. दुसऱ्या दिवशी या जळलेल्या पण धग कायम असलेल्या चाकोल्यांवर पाणी गरम करायचे आणि त्या पाण्याने आंघोळ केली जायची. होलिका दहन करण्यापूर्वी तिचे पूजन करण्यात येते. होलिकेजवळ जाऊन पूर्व किंवा उत्तरेकडे मुख करून बसून पूजा करण्यात येते. होलिकेस चारही बाजूने तीन किंवा सात फेर धरून कच्च्या धाग्याने बांधण्यात येते. शुद्ध पाणी व अन्य पूजा साहित्य एक एक करून होलिकेस समर्पित करण्यात येते. पूजेनंतर पाण्याने अर्घ्य देण्यात येते. एक कलश पाणी, अक्षता, गंध, पुष्प, गूळ, साबुदाणा, हळद, मूग, बत्तासे, गुलाल, नारळ, पुरणपोळी इत्यादींची आहुती देण्यात येते. नवीन धान्याचा अंश जसे, गहू, चणे इत्यादींच्या लोंबी यांचीही आहुती देण्यात येते. होलिकेची पूजा केल्यानंतर तिचे दहन केले जाते. होलिका दहन नेहमी भद्रे नंतरच करावे. चतुर्दशी किंवा प्रतिपदा तिथी असताना होलिका दहन करण्यात येत नाही. सूर्यास्तापूर्वी सुद्धा होलिका दहन करू नये. होलिकेच्या अग्नीत भाजले गेलेले पदार्थ खाल्ल्याने व्यक्ती निरोगी राहते. होळीतून निर्माण झालेली राख दुसऱ्या दिवशी सकाळी घरी आणल्यास घरातील नकारात्मक शक्तींचा नायनाट होतो, अशी मान्यता आहे. पौराणिक आख्यायिकेनुसार दैत्यराज हिरण्यकश्यपू स्वतःलाच देव समजत होता. त्याचा पुत्र प्रल्हाद हा भगवान विष्णू खेरीज अन्य कोणाचेही पूजन करत नसे. यामुळे हिरण्यकश्यपू अत्यंत क्रोधीत झाले आणि अखेर त्यांनी आपली बहीण होलिका हिला प्रल्हादला आपल्या मांडीवर बसवून अग्नीत बसण्याचा आदेश दिला. होलिकेस आगीत तिचे काहीच नुकसान होणार नाही, असा एक वर प्राप्त होता.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ४०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | | | 3 | | | | 5 | |
| | 3 | | 2 | 9 | | 8 | | |
| | | | 4 | | 8 | | | 3 |
| | 4 | 1 | 5 | | | 6 | | 9 |
| 6 | | | 7 | | | | | |
| | | 5 | | 4 | 6 | 2 | | |
| | | 8 | | | 7 | | 4 | |
| | 1 | 3 | | 5 | | | | 8 |
| 5 | 2 | | | 3 | | 1 | | |

## उत्तर सुडोकू -३९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 3 | 4 | 6 | 8 | 2 | 7 | 9 |
| 8 | 4 | 9 | 5 | 7 | 2 | 1 | 3 | 6 |
| 6 | 2 | 7 | 3 | 9 | 1 | 8 | 4 | 5 |
| 9 | 5 | 8 | 7 | 1 | 4 | 3 | 6 | 2 |
| 1 | 3 | 2 | 6 | 8 | 9 | 4 | 5 | 7 |
| 7 | 6 | 4 | 2 | 3 | 5 | 9 | 8 | 1 |
| 2 | 7 | 1 | 8 | 4 | 6 | 5 | 9 | 3 |
| 3 | 8 | 5 | 9 | 2 | 7 | 6 | 1 | 4 |
| 4 | 9 | 6 | 1 | 5 | 3 | 7 | 2 | 8 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

**२४ मार्च**

- ◆१३०७: देवगिरीचा वैभवशाली सम्राट रामदेवराव यादव यास मलिक काफूरने कैद करुन दिल्लीला नेले.
- ◆१६७७: दक्षिण दिग्विजयप्रसंगी शिवाजी महाराजांनी श्री शैल्य मल्लिकार्जुन येथे मुक्काम केला.
- ◆१८३६: कॅनडा देशाने आफ्रिकन कॅनेडियन लोकांना मतदानाचा अधिकार दिला.
- ◆१८५५: आग्रा आणि कलकत्ता या शहरांदरम्यान तारसेवा सुरू झाली.
- ◆१८९६: अ.एस. पोपोव यांनी इतिहासात पहिल्यांदाच रेडिओ सिग्नल चे प्रसारण केले.
- ◆१९२३: ग्रीस हे राष्ट्र प्रजासत्ताक बनले.
- ◆१९२९: लाहोर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन सुरु झाले.
- ◆१९७७: स्वातंत्र्यानंतर पहिलेच बिगर काँग्रेसचे सरकार येऊन मोरारजी देसाई पंतप्रधान झाले.
- ◆१९९३: शूमाकर-लेव्ही-९ या धूमकेतुचा शोध लागला. हा धूमकेतु जुलै महिन्यात गुरु ग्रहावर जाऊन आदळला.
- ◆१९९८: टायटॅनिक चित्रपटाला विक्रमी ११ ऑस्कर पुरस्कार मिळाले.
- ◆२००८: भूतान हे लोकशाही राष्ट्र बनले व प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या.
- ◆१९६२: जागतिक क्षय रोग दिन
- ◆१७७५: तामिळ कवी व संगीतकार मुथुस्वामी दीक्षीतार यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑक्टोबर १८३५)
- ◆१९०१: अमेरिकन ॲनिमेटर मिकी माऊस चे सह निमार्ते अनब्लॉक आय्वेर्क्स यांचा जन्म. (मृत्यू: ७ जुलै १९७१)
- ◆१९३०: हॉलिवूड अभिनेता स्टीव्ह मॅकक्वीन यांचा जन्म. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९८०)
- ◆१९५१: अमेरिकन फॅशन डिझायनर टॉमी हिल्फिगर यांचा जन्म.
- ◆१९८४: भारतीय हॉकी खेळाडू एड्रियन डिसूझा यांचा जन्म.
- ◆१८४९: जर्मन रसायनशास्त्रज्ञ योहान वुल्फगँग डोबेरायनर यांचे निधन. (जन्म: १३ डिसेंबर १७८०)
- ◆१८८२: अमेरिकन नाटककार व कवी एच. डब्ल्यू. लाँगफेलो यांचे निधन. (जन्म: २७ फेब्रुवारी १८०७)
- ◆१९०५: फ्रेन्च लेखक ज्यूल्स व्हर्न यांचे निधन. (जन्म: ८ फेब्रुवारी १८२८)
- ◆२००७: मराठी कथालेखक व कादंबरीकार श्रीपाद नारायण पेंडसे यांचे निधन. (जन्म: ५ जानेवारी १९१३)

## भविष्य

**मेष** – कौटुंबिक सौख्यात रमाल. गरज नसतांना प्रवास करावा लागू शकतो. लहान मुलांच्यात रमून जाल. व्यावसायिक बदल लक्षात घ्यावेत.

**वृषभ** – ऐक्याची भावना जोपासाल. दिवस मनाप्रमाणे व्यतीत कराल. थोरांशी सल्ला-मसलत कराल. कामात चंचलता येईल.

**मिथुन** – मोकळेपणाने बोलणे टाळाल. पत्नीचा प्रेमळ सहवास मिळेल. झोपेची तक्रार दूर होईल. संसर्गजन्य आजारांपासून काळजी घ्यावी.

**कर्क** – उगाचच चंचलता वाढेल. फार विचार करत बसू नका. मनातील इच्छेला अधिक महत्व द्याल. जोडीदाराचा हट्ट पुरा कराल. जुने विचार मनातून काढून टाकावेत.

**सिंह** – कलेसाठी अधिक वेळ काढाल. सर्वांच्या कौतुकास पात्र व्हाल. कामात स्थिरता ठेवावी. गप्पांमध्ये वेळ घालवाल. पोटाची काळजी घ्यावी. हातातील कामात यश येईल.

**कन्या** – कामात जोडीदाराचा हातभार लागेल. प्रगतीची नवीन संधी उपलब्ध होईल. मुलांना नवीन गोष्टी शिकवाल. व्यायामाचे महत्व लक्षात घ्यावे. अपचनाचा त्रास जाणवेल.

**तुला** – काही कामे कमी श्रमात पार पडतील. घरातील वातावरण अस्वस्थ वाटू शकते. नवीन गोष्टी आमलात आणताना विचार करावा. अचानक धनलाभ संभवतो. धार्मिक ग्रंथांचे वाचन करावे.

**वृश्चिक** – गरज नसेल तर प्रवास टाळावा. जोडीदाराचे सौख्य वाढेल. नवीन गोष्टींकडे कल वाढेल. मोहाळा बळी पडू नका. जवळचे मित्र भेटतील. भावंडांचे प्रश्न सामोरी येतील.

**धनु** – कौटुंबिक स्वास्थ्याला प्राधान्य द्यावे. नवीन लोकांशी संपर्क वाढेल. कामाचा आनंद घ्याल. लोकोपवादाला बळी पडू नका. जुन्या कामात प्रगती कराल. धैयार्ने कामे हाती घ्याल.

**मकर** – मानसिक ताण जाणवू शकतो. सतत बडबड कराल. कमिशनचा विचार आधी कराल. आवडते पुस्तक वाचाल. रागावर नियंत्रण ठेवावे. कामात आळस आड येऊ शकतो.

**कुंभ** – तुमच्या स्मरणशक्तीचे कौतुक केले जाईल. घरातील साफसफाई कराल. काही सकारात्मक बदल कराल. आवडता छंद जोपासाल. सामुदायिक गोष्टीत लक्ष घालू नका. नवीन विचारांची कास धरावी लागेल.

**मीन** – उगाचच थकवा जाणवेल. सकारात्मक विचार करावेत. हस्तकलेत मन रमवावे. लबाड लोकांचा संग टाळवा. खोट्याचा आधार घेऊ नका. नवीन विचारांची कास धरावी लागेल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# आणखी एक विरोधक टिपला

दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालया (ईडी)ने गुरुवारी रात्री उशिरा आम आदमी पक्षाचे अध्यक्ष आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केली. ईडीने अटकेआधी केजरीवाल यांना ९ वेळा चौकशीसाठी समन्स बजावले होते, मात्र हे समन्स बेकायदा असल्याचे म्हणत केजरीवाल अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात गेले होते. गुरुवारी दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून लावताच ईडीने केजरीवालांवर झडप घातली. ईडीचे पथक दहावे समन्स घेऊन केजरीवालांच्या निवासस्थानी हजर झाले आणि २ तासांच्या चौकशीनंतर त्यांना ताब्यात घेतले. केजरीवाल यांच्या अटकेने केवळ दिल्लीतच नाही, तर देशभरातील राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे. केजरीवाल यांना अटक केल्यानंतर ईडीने त्यांना दिल्लीच्या साऊथ एव्हॅन्यू न्यायालयापुढे हजर केले. तिथे अरविंद केजरीवालच मद्य धोरण घोटाळ्याचे मास्टरमाईंड अर्थात मुख्य सूत्रधार असल्याचा दावा ईडीने केला आहे. यावरून या प्रकरणात केजरीवाल यांचा पाय पुरता खोलात असल्याचे स्पष्ट होत आहे. कारण ईडीने गजाआड केलेल्या पुढांयांचा आतापर्यंतचा इतिहास पाहता केजरीवाल यांना जामीन मिळण्याची शक्यता नाही. केजरीवालांना झालेली अटक हा इंडिया आघाडीला बसलेला मोठा झटका आहे. केजरीवाल हे इंडिया आघाडीतील खंदे नेते समजले जातात. आधीच बिहारचे मुख्यमंत्री आणि जनता दल (संयुक्त)चे प्रमुख नितीश कुमार पुन्हा भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी(एनडीए)च्या तंबूत शिरल्याने भाजपशी दोनहात करताना इंडिया आघाडी बॅकफूटवर आली होती. त्यात जागावाटपाच्या नावाखाली पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी काडीमोड घेतल्याने इंडिया आघाडी दुभंगली. पंजाबमध्ये आम आदमी पक्षाने काँग्रेससोबत न जाण्याची भूमिका घेतल्याने केजरीवालांच्या हेतूवरही शंका उपस्थित होऊ लागल्या होत्या, परंतु उत्तर प्रदेशात ज्या प्रकारे समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यांनी अखेरच्या क्षणी काँग्रेससोबत जुळवून घेतले, तीच नीती केजरीवालांनी दिल्लीत अवलंबल्यामुळे इंडिया आघाडीतील नेत्यांच्या जीवात जीव आला, मात्र आता केजरीवाल यांच्या अटकेमुळे इंडिया आघाडीच्या तंबूचा आणखी एक बांबू निश्चितपणे उखडला गेला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने गेल्याच आठवड्यात लोकसभेची आचारसंहिता लागू केली. आचारसंहितेच्या काळात एका राज्याच्या मुख्यमंत्र्याला गजाआड करण्याचे धाडस ईडीने दाखवले, हे सरकारी पाठिंब्याशिवाय शक्य नाही. त्यामुळेच केजरीवालांच्या अटकेमागे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप सरकारचाच हात असल्याचा आरोप आपचे नेते आणि कार्यकर्ते रस्त्यावर उतरून करत आहेत. भाजपला ह्यअब की बार ४०० पारह्णच्या वेडाने झपाटून टाकले आहे. विरोधकांना ईडी, सीबीआय, प्राप्तिकर किंवा इतर कुठल्याही तपास यंत्रणांचा ससेमिरा लावून शरण आणले जात आहे. लोकसभा निवडणूक जाहीर होण्याच्या काही दिवसांआधीच झारखंडचे मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोचार्चे प्रमुख हेमंत सोरेन यांनाही ईडीने जमीन घोटाळ्याप्रकरणी अटक केली होती. केजरीवालांच्या अटकेच्या हातघाईवरून हे प्रकार मतदानाच्या शेवटच्या दिवसापर्यंत सुरू राहतील अशी चिन्हे दिसत आहेत. हेमंत सोरेन यांना अटक झाली, त्यावेळी त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा देत पक्षाचे प्रमुख नेते चंपई सोरेन यांच्या हाती पक्षाची धुरा सोपवली होती. तरी तेथील राज्यपालांनी चंपई सोरेन यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ देण्यात वेळकाढूपणा केला होता. झारखंड मुक्ती मोर्चाच्या सुदैवाने पक्षाच्या आमदारांची या राज्यातून त्या राज्यात हलवाहलवी झाली, तरी एकही आमदार फुटला नाही आणि पुन्हा एकदा सोरेन सरकार सत्तेत आले. केजरीवालांनी तर मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा न देण्याचा पवित्रा घेतला आहे, परंतु तुरुगातून प्रशासन चालवणे वाटते तितके सोपे नाही. अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा न दिल्यास त्यांना पदावरून हटवता येऊ शकते का, याची चाचपणी गृहमंत्रालयाकडून सुरू असल्याचे समजते. कधीकाळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंच्या खांद्याला खांदा लावून भ्रष्टाचारविरोधी लढाई लढणारा एक सामान्य कार्यकर्ता याच लढाईतून नेता झाला. पुढे त्याने आम आदमीच्या नावाने पक्ष स्थापन केला आणि सत्तेतही आला. आम आदमी पक्षाचे देशपातळीवर हजारो नेते आणि लाखो कार्यकर्ते असले, तरी अरविंद केजरीवाल वगळता या पक्षाला दुसरा चेहरा वा खमके नेतृत्वही नाही. पक्षाचे दुर्सया क्रमांकाचे नेते म्हणजेच मनिष सिसोदिया आणि आपचे इतर काही नेते आधीच मद्य धोरण घोटाळा प्रकरणात गजाआड झालेले आहेत. जो नेता भ्रष्टाचारविरोधातील लढाई लढून मोठा होतो, पारदर्शक कारभाराची आश्वासने जनतेला देतो, तोच नेता भ्रष्टाचाराच्या प्रकरणात तुरुंगात जातो, अशी प्रतिमा ऐन लोकसभा निवडणुकीत तयार होणे आपसह इंडिया आघाडीसाठीही मारक ठरू शकते. केजरीवाल इंडिया आघाडीच्या प्रचारसभेतील स्टार कॅम्पेनर होते. अजून आपच्या पंजाब आणि दिल्लीतील लोकसभा उमेदवारांची घोषणा व्हायची आहे. केजरीवालांच्या अटकेमुळे या सार्या प्रक्रियेचा खोळंबा होणार आहे. या कारवाईने भाजपने आणखी एक विरोधक टिपला आहे. निवडणूक रोख्यांवरून होणार्या भ्रष्टाचारावरील टीकेचा रोख आता केजरीवालांकडे वळला आहे. शिवाय आपचा झंझावाती वारू निवडणुकीच्या आतच रोखला गेला आहे. एकाच दगडात दोन पक्षी मारण्याचा सत्ताधार्यांचा हा डाव यशस्वी होतो की अंगलट येतो, हे येत्या निवडणुकीत कळेलच.

# हम 'आप' के हैं कौन?

केजरीवाल अहंमन्य आहेत, दोषीही असतील; पण त्यांच्या अटकेतून कुठल्याही परिस्थितीत लोकसभा जिंकण्यासाठी भाजपची होत असलेली तडफड उघड झाली. आम आदमी पक्ष अर्थात आप चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या अटकेचा थेट संबंध सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखेप्रकरणी दिलेल्या निकालाशी नाही याची खात्री कोणीही देणार नाही. आत्तापर्यंत कोणीही थेटपणे केंद्रातील सत्ताधारी भाजपवर आर्थिक घोटाळ्यांचे, भ्रष्टचाराचे आरोप केले नव्हते. दहा वर्षांमध्ये पहिल्यांदाच भाजपला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाऊ लागले आहे. देशभर निवडणूक रोख्यांमुळे राजकीय गदारोळ माजला असताना, त्याची राळ कमळावर उडत असताना ईडी ने केजरीवाल यांना अटक केली हा योगायोग कसा मानणार? रोख्यांच्या निकालानंतर देणग्यांच्या बदल्यात कुठल्या देणगीदाराला कंत्राटी लाभ मिळला हेही समोर येऊ लागलेले आहे. निवडणूक रोख्यांचा लपूनछपून सर्वाधिक लाभ मिळालेल्या भाजपला हमाम मे सब नंगे असे म्हणण्याचीही सोय उरलेली नाही. निवडणूक रोख्यांचा व्यवहार संघटित भ्रष्टचार असल्याचा आरोप होत असेल तर त्यातील आरोपी कोण, हे सांगण्याची गरज नाही. पण या संघटित व्यवहारांमध्ये आप ला फारसे काही हाती लागलेले नाही. त्या पक्षाने जनतेकडून वर्गणी गोळा करून निवडणुका लढवल्या. याचा अर्थ मद्य विक्री घोटाळा प्रकरणात केजरीवाल निर्दोष आहेत असा अजिबात नाही. दिल्ली सरकारचे हे धोरण संशयास्पद निश्चित आहे. कारण स्वतःलाच नैतिकतेचे मेरुमणी मानणाऱ्या केजरीवालांनी प्रशासनात असे बदल केले की त्यामुळे त्या क्षेत्राचे सर्वाधिकार त्यांच्या हाती येत गेले. कायदा असा की दिल्लीत सर्वाधिकार मुख्य सचिवांहाती असतात. केजरीवालांनी त्यातील अनेक अधिकार मंत्र्यास दिले. वास्तविक कोणत्याही व्यवस्थेत राजकीय व्यक्तींस असे प्रशासकीय अधिकार नसतात. ते केजरीवालांनी करून दाखवले. त्यातूनच या मद्य धोरणाचा वाद उत्पन्न झाला आणि त्यात आप चे एकापाठोपाठ एक अनेक नेते अडकले. ईडीने अखेर मुख्यमंत्र्यांचाच घास घेतला. निवडणूक रोख्यांत कोणी तरी दुसऱ्याच खलनायकाचा विद्रूप चेहरा दिसू लागला असताना नव्या खलनायकाची गरज केंद्रीय सत्ताधाऱ्यांस होती. ती केजरीवाल पूर्ण करतात. ईडी अटक करणार असल्याचे भाकीत केजरीवाल यांनी आधीच लिहून ठेवले होते, त्यामुळे त्यांच्या अटकेचे आश्चर्य कोणाला वाटले नसावे. केजरीवाल यांच्या अटकेपेक्षाही त्यांच्या अटकेचा आदेश दिला कोणी, हा राजकीय चचेर्चा मुद्दा बनला आहे! महिन्याभरात ईडीने दोन मुख्यमंत्र्यांना आर्थिक घोटाळ्यातील कथित सहभागाचा आरोप ठेवत अटक केली. आधी झारखंड मुक्ती मोचार्चे (झामुमो) प्रमुख हेमंत सोरेन आणि आता आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा केजरीवाल. दोन्ही मुख्यमंत्री भाजपेतर आणि विरोधकांच्या इंडिया आघाडीचे महत्त्वाचे घटक पक्ष. दोघांनीही काँग्रेसशी आघाडी केलेली आहे. सोरेन तरी छोटया राज्याचे मुख्यमंत्री. तिथे फोडाफोडीचे शिंदे-पवार सूत्र फोल ठरले असावे. नाही तर झामुमोचे सरकार टिकले नसते. पण केजरीवालांची दिल्ली म्हणजे महाराष्ट्र नव्हे. मातोश्रीची पायरी उतरले; गेले सुरतला अशी पळवाट आप नेत्यांनी शोधली नाही. आप वाले पक्के केजरीवालभक्त. त्यांना फोडणे आणखी कठीण. शिवाय, दिल्लीकर अजूनही केजरीवालांच्या पाठीशी दिसतात. मग ईडी च्या सूत्रधारांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर केजरीवाल यांना अटक करण्याचे धाडस का केले? त्याचे उत्तर राजकारणात आहे. गेल्या २०१९ च्या निवडणुकांत दिल्लीतील लोकसभेच्या सातही जागा भाजपने जिंकल्या होत्या. राज्यात केजरीवाल, केंद्रात मोदी असे म्हणत केजरीवाल यांना विधानसभेत भरघोस मते देणाऱ्या दिल्लीकरांनी लोकसभा निवडणुकीत भाजपला पाठिबा दिला. पाच वर्षांनंतर राजकीय परिस्थिती बदललेली आहे. या वेळी आपआणि काँग्रेस एकत्र आल्याचे पाहूनच भाजपला सातपैकी सहा उमेदवार बदलावे लागले आहेत. दिल्लीतील लढाई एकतर्फी नसल्याचे भाजपला एव्हाना कळून चुकले आहे. राजधानीतील लढाई जिंकायची असेल तर आपचे मानसिक खच्चीकरण करणे गरजेचे. केजरीवाल तुरुंगात गेले तर आप कडे ऐन लोकसभा निवडणुकीत नेतृत्व करण्यासाठी उरेलच कोण, असा हा विचार. केजरीवालांना लोकांमध्ये असलेले स्थान आतिशी वा आपच्या इतर नेत्यांना नाही. मग हे नेते निवडणूक प्रचार करणार कसे? दिल्लीचा किल्ला पडला की पंजाबच नव्हे, देशभरात इंडिया च्या पराभवाचा संदेश जाऊ शकतो, असा हिशेब भाजपने लावला असेल तर ते चुकीचे नसेल. केजरीवाल यांना गुरुवारी अटक होण्याच्या काही तास आधी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, राहुल गांधी अशा धुरंधरांनी पत्रकार परिषद घेऊन, आमच्याकडे रेल्वेचे तिकीट काढायलाही पैसे नाहीत, असे रडगाणे गायले. सात वर्षांपूर्वीच्या कर प्रकरणात प्राप्तिकर विभागाने काँग्रेसची बँक खाती गोठवलेली आहेत. लोकसभा निवडणूक चार आठवडयांवर आली असताना काँग्रेसला स्वतःच्या बँकेतील पैसेही वापरता येत नाहीत. मग, आमचे नेते लोकसभा निवढणूक कसे लढणार, हा काँग्रेसचा मुद्दा रास्तच. आप कडे नेतृत्व नसेल आणि काँग्रेसकडे पैसेच नसतील तर दिल्लीत दोन्ही पक्षांच्या मुसक्या आवळल्या जातील. विरोधकांची मानसिक ताकद संपुष्टात आली तर भाजपच्या अश्वमेधाचा घोडा अडवणार कोण? केजरीवालांच्या अटकेतील दुसरा आणि अत्यंत गंभीर मुद्दा असा की, दिल्ली सरकारचे आता काय होणार? केजरीवालांकडे कार्यकर्त्यांची फौज भक्कम असली तरी आतिशीसारखे एखाद-दोन नेते वगळले तर आपकडे नेतृत्व नाही. केजरीवालांना अटक होणार याची कल्पना होती, ते तुरुंगात गेले तर दिल्लीतील आप चे सरकार चालवण्यासाठी त्यांच्याकडे दोन आराखडे तयार होते. केजरीवाल तुरुंगातून सरकार चालवतीलही. पण हा वास्तव पर्याय होऊ शकत नाही. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव यांना अटक झाली तेव्हा त्यांनी पत्नी राबडी देवींना मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसवले. इथेही केजरीवाल यांना अन्य नेत्याकडे सत्ता सोपवावी लागेल. पण, आत्ता तरी आप आणि केजरीवाल पहिलाच पर्याय घेऊन बसले आहेत. खरे तर याच संधीची कित्येक वर्षे भाजप वाट पाहात होता. केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदावर राहण्याचा हट्ट सोडला नाही तर नायब राज्यपाल दिल्लीत राष्ट्रपती शासन लागू करण्याची शिफारस राष्ट्रपतींना करू शकतील. तसे झाले तर दिल्लीवर भाजपचा पूर्णपणे कब्जा होईल. अशा राजकीय कोंडीमध्ये लोकांना तरी आपल्याखेरीज अन्य पर्याय उरणार नाही असा भाजपचा विचार दिसतो. केजरीवालांच्या अटकेतून भाजपची लोकसभा निवडणूक कुठल्याही परिस्थितीत जिंकण्यासाठी होत असलेली तडफड उघडयावर आली आहे. महाराष्ट्र, बिहार, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश अशा ठिकठिकाणी नवनवे पक्ष आणि त्यांचे उपद्रवापी नेते जवळ करण्याचा सपाटा भाजपने सुरू केला आहे. जिथे पक्ष वा नेते मिळत नाहीत, तिथे नेत्यांचा केजरीवाल केला जाऊ लागला आहे. आतापर्यंत अनेकदा आप आणि केजरीवाल यांच्या आत्मकेंद्री, दांभिक राजकारणावर टीकेचे आसूड ओढले आहेत. तथापि सद्यःस्थितीत केजरीवाल हे भाजप-शरण न जाण्याच्या धाडसाचे बळी ठरतात, असे म्हणावे लागते. भाजपने आप ला राजकीयदृष्ट्या जरूर नामोहरम करावे. पण हा मार्ग नव्हे. केजरीवाल वा आप दोषी की निर्दोष हा मुद्दाच नाही. तर फक्त भाजप-विरोधी पक्षनेत्यांचेच दोष समोर येऊन, त्यांच्यावरच निवडक कारवाई कशी होते हा प्रश्न आहे. अशा वेळी दिल्ली आणि अन्यत्र लोकशाहीप्रेमी नागरिकांनी हम आप के हैं कोन हे दाखवून देत त्या पक्षास पाठिबा दिला तर सत्ताधाऱ्यांची ही खेळी उलटण्याचा धोका संभवतो.



# शांतता समितीच्या बैठकीत पोलीस उपायुक्तांनी केले नागरिकांना मार्गदर्शन

■ **भिवंडी:** येणारा काळ हा सण उत्सवाचा आहे.त्यामुळे आपल्या संस्कृतीचे पालन करून सर्वांनी धार्मिक सण - उत्सव साजरे करावेत सण हे आनंद व स्फूर्ती देणारे असतात.त्यामुळे त्याचा आनंद लुटावा इतरांना त्याचा त्रास होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेणे आवश्यक आहे, असे मत भिवंडी पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांन यांनी आयोजित केलेल्या शांतता समिती बैठकीत व्यक्त केले. येत्या २४ व २५ रोजी होळी व धूलिवंदन त्याच बरोबर येत्या २७ व २८ मार्च रोजी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव संपन्न होणार आहे.

सण व उत्सव शांततेमध्ये व आनंद वातावरणात संपन्न होण्यासाठी भिवंडी परिमंडळ २ चे पोलीस उपाआयुक्त श्रीकांत परोपकारी यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समिती सदस्य,उत्सव समितीचे सदस्य व नागरिकांची विशेष बैठक पोलीस संकुल सभागृहात आयोजित केली होती. यावेळी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,शिवजयंती उत्सव समितीचे सचिव मदन भोई,सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक देशमुख यांच्यासह वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते. जगामध्ये भारता देश असा आहे की, येथे मोठया प्रमाणात धार्मिक उत्सव व सण संपन्न होत असतात.




■ छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आदर्श पुरुष होते त्यांनी दिलेल्या शिकवणीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा चांगले शिक्षण घ्या आणि आपल्या जीवनात प्रगती करा असे आवाहन त्यांनी केले .लोकसभा निवडणूक अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे .

■त्यामुळे त्याचे पालन करावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांनी यावेळी केले .शहरातील खराब रस्ते, अस्वच्छता आणि सुरळीत वीज पुरवठा करणे, बॅनरबाजी अशा विविध समस्या बाबत उपस्थित सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त करून महापालिका व पोलीस प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी केली .

या उत्सवाचा आनंद प्रत्येकाने घेतला पाहिजे, मात्र उत्सव संपन्न करताना इतरांना त्याचा त्रास होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. एकमेकाचा आदर करून उत्सवाचा आनंद घ्या त्याचा बेरंग करू नका, उत्सवाच्या दरम्यान कोणी अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर कारवाई केली जाईल असा इशारा पोलीस उपायुक्त परोपकारी यांनी यावेळी दिला.

# सीसीटीव्हीच्या मदतीने १२१ चोरांना अटक


■ **मुंबई,** पश्चिम रेल्वेच्या आरपीएफ पोलिसांनी गेल्या अडीच महिन्यांत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने १२१ चोरांना अटक केली आहे. त्यांच्याकडून सुमारे ४४ लाख रुपयांची चोरीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. रेल्वेची मालमत्ता, प्रवासी सुरक्षिततेची जबाबदारी रेल्वे सुरक्षा दलाकडे आहे. मात्र, रेल्वे प्रवासात होणाऱ्या चोरीच्या घटना काही कमी होताना दिसून येत नाहीत. त्यामुळे या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पश्चिम रेल्वेच्या आरपीएफ पोलिसांनी कंबर कसली आहे. चोरांवर नजर ठेवण्यासाठी रेल्वे परिसरात मोठ्या प्रमाणात सीसीटीव्ही लावले आहेत. सध्या पश्चिम रेल्वेवर ३ हजार ९१२ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. यात ४८८ कॅमेरा इनबिल्ट फेशियल रिकग्निशन सिस्टिम (चेहरा ओळखणारे) आहेत. या चेहरा ओळखणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेरांच्या माध्यमातून शंभरपेक्षा जास्त गुन्ह्यांचा छडा लावला आहे.

# १७८ कोटींच्या वीज बिल थकबाकी वसुलीचे आव्हान

## चालू बिलासह थकबाकी भरण्याचे महावितरणचे आवाहन

■ **कल्याण** :महावितरणच्या कल्याण परिमंडलात आर्थिक वर्ष संपण्यास अवघे तीन-चार कार्यालयीन दिवस उरले असतानाही वीज ग्राहकांकडे (कृषिपंप व कायमस्वरुपी वीज खंडित ग्राहक वगळून) तब्बल १७८ कोटी रुपयांच्या थकीत वीज बिल वसूलीचे आव्हान कर्मचाऱ्यांसमोर आहे. त्यामुळे थकित रकमेची वसुली अथवा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करणे हे दोनच पर्याय त्यांच्यासमोर आहेत.

संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी थकबाकीदारांनी थकीत रकमेचा तर इतर ग्राहकांनी चालू वीजबिलाचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.थकबाकी वसुलीसाठी मुख्य अभियंत्यांसह जनमित्रांपर्यंत सर्वच स्तरावरील अधिकारी, अभियंते व कर्मचारी वाढत्या तापमानातही वसूलीच्या कामासाठी फिल्डवर आहेत. वीजबिल भरण्याची मूदत संपलेल्या कल्याण परिमंडलातील २ लाख ७६ हजार ९७९ ग्राहकांकडून १७६ कोटी ९७ लाख रुपयांची थकबाकी वसूल होणे बाकी आहे. कल्याण पूर्व आणि पाश्चिम तसेच डोंबिवली विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल कार्यालय एक अंतर्गत ४५ हजार १८१ ग्राहकांकडे १५ कोटी ३२ लाख रुपयांची थकबाकी आहे. उल्हासनगर एक आणि दोन, बदलापूर विभागाचा समावेश असलेल्या मंडल दोन अंतर्गत ८६ हजार ५६१ ग्राहकांकडे ६४ कोटी ८ लाख रुपयांचे वीजबिल थकित आहे.




◆कल्याण परिमंडलात थकीत वीजबिलापोटी १० हजार ३९४ ग्राहकांचा वीजपुरवठा मार्चमध्ये खंडित केला आहे .मार्च अखेरपर्यंत रविवार आणि इतर सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरु ठेवण्यात येणार आहेत . याशिवाय महावितरणचे संकेतस्थळ, ग्राहकांसाठीचे मोबाईल ॲप, विविध पेमेंट वॅलेट आदींच्या माध्यमातून डेबिट/क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग मार्फत वीजबिल ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे . या सुविधांचा उपयोग करून संबंधित ग्राहकांनी थकबाकी व इतर ग्राहकांनी चालू वीजबिलाचा विहित मुदतीत भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे .

# "Dhoni must have told Ruturaj last year": Ash on Dhoni's captaincy transfer to Gaikwad



■ **Jaipur:** Veteran all-rounder Ravichandran Ashwin on Friday said that it was inevitable that MS Dhoni was going to hand over the captaincy reins to another player this season. A day before the start of IPL 2024, Chennai Super Kings (CSK) announced that Gaikwad would be skipper. CSK had attempted the leadership transition in 2022 too, but it did not work out with Ravindra Jadeja handing the captaincy duties back to Dhoni after eight games. The Ruturaj decision was not surprising, said Ashwin. "This decision was inevitable and it was coming at some stage. I have known MS Dhoni, he keeps the team in the forefront, always thinking about the team's well-being. Because of this, two years ago, he had given the captain's armband to Jadeja. He has handed it to Ruturaj now. The decision had to happen," Ashwin said on his YouTube channel. "I believe Dhoni must have told Ruturaj last year, 'Brother, you are going to take charge. You can do it. I will be there, so you don't need to worry'," added Ashwin. Meanwhile, Gaikwad revealed that Dhoni had hinted last season about giving him the captaincy, saying "be ready for something big."

# Andheri subway may see closures this monsoon season too



■ Mumbai

The Andheri subway was closed 21 times due to heavy rainfall between July and September 2023 due to accumulation of water and such flooding is expected this year as well. Nullah-widening projects worth R100 crore, which will provide some relief, are still in their primary phase and won't be completed before 2026. The BMC floated tenders estimated at Rs 100 crore for three works to resolve the flooding issue of the Andheri subway in August 2022. The BMC will widen Mogra nullah from SV Road to Veera Desai Road and divert the nullah from the south side of Bhardawadi Culvert on JP Road to DN Nagar Metro station till Crystal Point Mall. The third work, diverting the nullah at Veera Desai Road to the courtyard junction to the RTO junction till City Mall has also been taken up. The work will take an estimated 18 months, excluding the monsoon period, to be completed. A BMC official said "The work is going on and you can see it while travelling in Andheri. The phase of SV Road to Veera Desai Road may be completed by 2025 but the other two phases will be completed in 2026. But we fear it will not be enough as the nullah cannot accommodate the flow of water coming rapidly from the east side amid heavy rainfall. It has to be widened but it is not possible due to structures on both sides." Another officer said the BMC is looking for a solution while laying an additional six by 2.5-foot or 125-sq-ft drain line to divert and discharge the heavy flow of water. The project report is ready and the work in two phases will require Rs 400 crore. "The work needed approval from the newly appointed additional commissioner. Once he approves it, we will float tenders after the elections," said the official.

The BMC also tried to use a high-capacity water pump last year, but it didn't yield the expected results. The main aim of the pump is to displace water into another big channel or the sea. The sea is 3 km from the subway and the drains are narrow. The issue of construction of the Mogra pumping station has been halted for years for one or the other reason. A land dispute case is being heard in the Bombay High Court. The pumping station was suggested in the BRIMSTOWAD project by the Chitale committee that was set up after the flood of July 2005. MLA Ameet Satam has requested the BMC to ensure the Barfiwala flyover is linked to Gokhale Bridge as soon as possible. Veermata Jijabai Technological Institute has made technical recommendations that the bridges be connected and the gap filled. The work will take around 90 days.

# पोलीस कारवाईची भीती दाखवून ८ लाखांवर सायबर चोरांचा डल्ला



■ **मुंबई** : मुंबई पोलीस आणि सीबीआयकडून कारवाईची भीती घालत सायबर ठगांनी चेंबूरमध्ये वास्तव्यास असलेल्या एका तरुणाच्या बँक खात्यातून ८ लाख २० हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याचा धक्कादायक प्रकार सामोर आला आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून चुनाभट्टी पोलीस अधिक तपास करत आहेत.

चेंबूरच्या लालडोंगर परिसरात दोन मित्रांसोबत राहत असलेला २६ वर्षीय अर्पित हा एका कंपनीत रिसर्च असोशिएट पदावर कार्यरत आहे. गुरुवारी सकाळी त्याला एका अनोळखी नंबरवरून कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने तुमचा मोबाईल नंबर ब्लॉक होणार आहे. नंबर ब्लॉक होण्यापासून वाचवण्यासाठी त्याने मोबाईलच्या कीपॅडवरील ९ नंबर क्लिक करण्यास सांगितले.

कॉलवरील बोलणे ऐकून घाबरलेल्या अर्पितने ९ नंबरवर क्लिक केले. पुढे हा कॉल डीपार्टमेंट ऑफ टेलीकम्युनिकेशनला जोडला गेला. समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने अर्पितला तुमच्या मोबाईलवरून अवैध जाहिराती आणि मानसिक त्रास देणारे मेसेज पाठवत आहात. त्यामुळे तुमचा मोबाईल नंबर नोंद करण्यात आला आहे. पुढे, त्याला आधारकार्डची विचारणा करत मुंबई पोलिसांकडून पडताळणी करावी लागेल, असे सांगण्यात आले.

अर्पितचा कॉल मुंबई पोलीस विनय कुमार चौबे यांच्या नावाने जोडून देण्यात आला. समोरून बोलणाऱ्या कथित चौबे साहेब यांनी चुनाभट्टी पोलीस ठाण्यातून बोलत असल्याची बतावणी करीत पोलीस ठाण्यात येण्यास सांगितले. अर्पितने ऑफिसचे काम करीत असल्याचे सांगितल्याने त्याला ऑनलाइन पडताळणी करतो, असे सांगून स्काईप ॲप डाऊनलोड करण्यास भाग पाडले.

अर्पितने स्काईप ॲप डाऊनलोड करताच त्याला व्हिडीओ कॉल आला. समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने पोलीस बॅच, पिस्तूल, हातकडी दाखवली. त्यामुळे अर्पित चांगलाच घाबरला. पोलिसांनीच आपल्याला कॉल केला आहे, अशी त्याची खात्री झाली. अर्पितला ॲपद्वारे एफआयआर कॉपी पाठवण्यात आली. कारवाईची भीती दाखवून त्याला सायबर चौकशीमध्ये मनी लॉँडरिंगमध्ये ॲक्टिव्ह असल्याची माहिती पाठवली.

अर्पित विरोधात अटक वॉरंट आणि फ्रीज वॉरंट काढले आहे. ही केस सीबीआयकडे सुरू असल्याचे सांगून चौबे नाव सांगणाऱ्या व्यक्तीने बँक खात्याची माहिती घेऊन मोबाईल स्क्रीन शेअर करण्यास सांगून मोबाइल बँकिंग ॲपच्या माध्यमातून ८ लाख २० हजार रुपये वळते करून घेतले. बँक खात्याची पडताळणी करून घेतलेली रक्कम परत पाठवू, असे त्यांनी सांगितले होते. त्यानंतर ना कॉल आला, ना खात्यातून काढून घेतलेली रक्कम परत मिळाली. अखेर आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने अर्पितने चुनाभट्टी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली आहे.

# बदलापुरात सासऱ्याकडून जावयाची हत्या



■ **बदलापूर** : काही दिवसांपूर्वी बदलापूर-मुरबाड रस्त्यावर मृतावस्थेत आढळलेल्या योगेश केणे या ३८ वर्षीय व्यक्तीची हत्या झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दारू पिऊन शिवीगाळ करत पेंढ्याला आग लावण्याची धमकी दिल्याने संतापलेल्या सासऱ्याने केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

बदलापूर-मुरबाड रस्त्यावरील मोऱ्याचा पाडा या गावात बारवी नदीवरील पुलाखाली, १ मार्च रोजी दगडावर योगेश केणे (३८) याचा मृतदेह आढळून आला होता. कुळगाव पोलीस ठाण्यात याप्रकरणी सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. तसेच ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक डॉ. दीपाली घाटे, मुरबाड उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश शिंदे आदींच्या मार्गदर्शनाखाली कुळगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि गोविंद पाटील, पोह. डी. पी. केंगार, पवार, खडताळे, पोशि. राहुल दाभाडे यांच्या तपास पथकाची उभारणी करून पुढील तपास सुरू करण्यात आला होता. या तपासात योगेश केणे (३८) याचा हा मृतदेह असल्याचे स्पष्ट झाले. त्याचबरोबर सासऱ्याने केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याचेही पुढे आले. योगेश केणे हा २९ फेब्रुवारीला दारू पिऊन घरी आला आणि सासरा संतोष नाईक यास शिवीगाळ करून तुमच्या पेंढ्याला आग लावतो, असे सांगून घराच्या आजूबाजूला फिरत होता.

याचा सासरा संतोष याला राग आल्याने तो योगेशला मारण्यासाठी त्याच्या अंगावर धावला. मात्र योगेश पळून गेला. त्यानंतर रात्री योगेश हा दारू पिऊन घरी येत असताना संतोषने पाहिले आणि घरी येताच त्यास पकडून ठोश्याबुक्क्याने मारहाण केली. या मारहाणीत योगेश बेशुद्ध अवस्थेत खाली पडला, तेव्हा संतोषने त्याला घरातील जनावराच्या खाद्याच्या काळ्या रंगाच्या प्लास्टिक पिशवीमध्ये भरून त्या पिशवीचे तोंड बांधले आणि ही पिशवी मोटारसायकलवर दोरीने बांधून सुमारे ७ ते ८ किलो मीटर अंतरावर बदलापूर ते मुरबाड जाणाऱ्या रोडवर मोऱ्याचापाडा गावाच्या हद्दीतील ब्रिजवरून बारवी नदीच्या पात्रात असलेल्या दगडावर फेकून दिली. यामध्ये योगेशच्या डोक्याला, कानाला व इतर ठिकाणी गंभीर मार लागून जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी संतोष नाईक याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# बैलगाडा मालक राहुल पाटीलचा कारागृहातील मुक्काम वाढला

## जामीन अर्ज पनवेल न्यायालयाने फेटाळला



■ **पनवेल** : पनवेल तालुक्यातील ओवळे गावच्या हद्दीत बैलगाडा शर्यतीमध्ये झालेल्या राड्यानंतर दहशत माजवणाऱ्या राहुल पाटीलची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. त्यानंतर राहुल पाटीलच्या वकिलांनी न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. मात्र पुन्हा एकदा राहुल पाटील आणि समर्थकांची निराशा झाली आहे. न्यायालयाने राहुल पाटीलला दिलासा देण्यास नकार दर्शवला असून त्याचा कोठडीतील मुक्काम आणखी काही दिवसांनी वाढला आहे.

पनवेल तालुक्यातील ओवळे गावच्या हद्दीत १२ मार्च रोजी झालेल्या बैलगाडा शर्यतीमधील राड्यानंतर राहुल पाटीलवर पनवेल शहर पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून अटकेची कारवाई केली होती. यावेळी ५ दिवस पोलीस कोठडीत वास्तव्य केल्यानंतर न्यायालयाने राहुल पाटीलची कल्याण येथील आधारवाडी कारागृहात रवानगी केली होती. त्यानंतर राहुल पाटीलचे वकील ॲड. वसीम शेख यांनी पनवेल न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र न्यायालयाने हा अर्ज अमान्य करून राहुल पाटीलला जामीन नाकारला आहे. त्यामुळे राहुल पाटीलच्या अडचणींत वाढ झाली असून हे गोळीबार प्रकरण 'मथुर' मालकाला चांगलेच जड जाणार असल्याचे बोलले जात आहे. आता राहुल पाटीलचा कारागृहातील मुक्काम वाढला आहे.

# मुंबई-नाशिक महामार्गावरील दरोड्यातील १२ जणांना अटक

■ **शहापूर** : मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यातील आटगाव येथे रोख रक्कम घेऊन मुंबईकडे निघालेल्या गाडीला थांबवून लुटण्यात आले होते. ही घटना शुक्रवार, १५ मार्च रोजी घडली होती. तब्बल ७ दिवसांनंतर ८ व्या दिवशी या गुन्ह्यातील १२ जणांना अटक करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला यश आले आहे. त्यांच्याकडून लुटीतील ५० टक्के रक्कम जप्त करण्यात आली आहे. जळगाव जिल्ह्यातील स्कायकिंग कुरिअरच्या ऑफिसमधून कैलास लोहार व सचिन सोडे यांच्या रोख रकमेने भरलेल्या २ गोणी घेऊन कुरिअर कंपनीची पिकअप व्हॅन मुंबईकडे निघाली होती. मध्यरात्री अडीचच्या सुमारास नाशिक येथे स्कायकिंग कुरिअरच्या ऑफिसमध्ये आल्यानंतर रोकड असलेल्या गोण्या दुसऱ्या पिकअप व्हॅनमध्ये भरून कुरिअर कंपनीचे कर्मचारी मुंबईच्या दिशेने निघाले होते. पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर तालुक्यातील आटगावच्या हद्दीत पिकअपला एक इनोव्हा कार आडवी घालून कारमधील काहीजण खाली उतरले. हातात प्लास्टिकची पोलीस काठी असलेल्या एकाने आम्ही पोलीस डिपार्टमेंटची माणसे आहोत, गाडीमध्ये काय आहे? आम्हाला गाडी चेक करायची आहे. असे पोलीस असल्याचे भासवून गाडीमधील ५ कोटी ४० लाख रुपयांची रोकड असलेल्या २ गोण्या घेऊन पोबारा केला. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यानंतर तब्बल शुक्रवारी ८ व्या दिवशी स्थानिक गुन्हे शाखेचे सुरेश मनोरे यांच्या पथकाने १२ दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या गुन्ह्यात आणखी काही आरोपी असण्याची शक्यता असल्याचा संशय वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, त्या दिशेने शोध सुरू आहे.

# केवायसीच्या बहाण्याने नातीनेच लाटले आजीचे लाखो रुपये

■ **मुंबई** : बँक केवायसीच्या बहाण्याने नातीनेच ९४ वर्षीय आजीच्या बँक खात्यातून तब्बल नऊ लाख ७४ हजार रुपये काढल्याचा धक्कादायक प्रकार घाटकोपरमध्ये उघडकीस आला आहे. आजीने दिलेल्या तक्रारीवरून घाटकोपर पोलिसांनी पूनम भंडारी नावाच्या नाती विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. घाटकोपरमधील रहिवासी खष्टीदेवी भाकुनी यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, पतीच्या निधनानंतर त्या मोठा मुलगा हरीशसोबत राहतात. डिसेंबर २०२० मध्ये हा मुलगा आजारी असल्याने नात पूनम त्यांना भेटण्यासाठी आली होती. ३० डिसेंबरला पूनमने भाकुनी यांना त्यांच्या बँक खात्याची केवायसी अपडेट करायची असल्याचे सांगून बँकेत नेले. तिने केवायसी फॉर्मसोबत आणखी काही फॉर्मवरसुद्धा सह्या घेतल्या. फेब्रुवारी २०२१ मध्ये उत्तराखंडला जायचे असल्याने त्यांनी हरीशकडे पैशांची मागणी केली. हरीशने त्यांना दुसऱ्या मुलाने पैसे काढल्याचे सांगितले. पुढे, बँक स्टेटमेंट बघितल्यानंतर नात पूनमचा प्रताप उघडकीस आला.

## प्रचार साहित्यावर मुद्रक, प्रकाशकांची नावे आवश्यक

■ **ठाणे** : लोकसभा निवडणुकीसाठी छपाई करण्यात येणाऱ्या प्रचार साहित्यावर मुद्रक, प्रकाशक यांच्या नाव पत्त्यासह त्यावर संख्या असणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रिंटींग प्रेसने काम करावे,असे निर्देश लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ च्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत. प्रचार साहित्य छापून घेण्यासाठी येणाऱ्या उमेदवाराकडून दोन ओळखीच्या व्यक्तींच्या सह्यांसह दोन प्रतींमध्ये स्वतःचे घोषणापत्र प्रिंटर्सने घेणे आवश्यक आहे. त्याबरोबरच या घोषणापत्राची एक प्रत जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे देणे बंधनकारक आहे.

# चक्क टोईंग व्हॅनखाली झोपून चालकांने सोडवली दुचाकी



■ **कल्याण**: नो - पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करण्यावरून वाहतूक पोलीस आणि वाहन चालकांमध्ये वाद होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. कल्याणमध्ये मात्र कारवाई दरम्यान उचलेली दुचाकी परत न दिल्याने चालकाने ..चक्क टोईंग व्हॅनखाली झोपून आपली दुचाकी सोडवून घेतल्याची घटना समोर आली आहे. शहरातील वाहतूक कोंडी दुर करण्यासाठी वाहतूक पोलीसांकडून नो - पार्किंगमध्ये उभी केलेली दुचाकी वाहने टोईंग व्हॅनमधून उचलली जातात. मात्र वाहने उचलण्याआधी टोईंग व्हॅनमधून अनाऊमेंट करणे आवश्यक असते. या दरम्यान वाहनचालक आल्यास ती गाडी उचलू शकत नाही. गुरूवारी कल्याण पश्चिमेतील खडकपाडा परिसरात टोईंगच्या कारवाई दरम्यान एक वेगळाच प्रकार घडला. वाहतूक पोलिसांनी दुचाकी टोईंग केल्याने वाहन चालकाने चक्क टोईंग गाडीखाली झोपून आपला संताप व्यक्त केला होता. आपली दुचाकी परत केल्याशिवाय बाहेर येणार नाही असा पवित्रा त्याने घेतला. शेवटी टोईंग गाडी पुढे काढण्यासाठी कोणताही पर्याय नसल्याने वाहतूक पोलिसांनी त्याची दुचाकी परत दिली. यानंतर गाडी खाली झोपलेला व्यक्ती बाजूला झाला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. तर दुसऱ्या एका घटनेत मुजोर रिक्षा चालकाने वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की करत दमदाटी केल्याचा प्रकार घडला. कल्याण स्टेशन परिसरात वाहतूकीचे नियमन करताना रिक्षा पुढे काढण्यास सांगितले म्हणून संतप्त रिक्षा चालकाने थेट वाहतूक पोलिसाच्या अंगावर धाऊन जात धक्काबुक्की केली. अन्य रिक्षा चालकांनी यावेळी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला.

## मुदतबाह्य खाद्यपदार्थ विक्री प्रकरणी गुन्हा

■ **भिवंडी**: भिवंडी शहर परिसरात मोठया प्रमाणावर मुदतबाह्य विविध प्रकारचे नामांकित खाद्यपदार्थ विक्री होत असून त्यामुळे मानवाच्या आरोग्यास बाधा पोहचत आहे.याबाबत अन्न व औषध प्रशासन सुरक्षा विभागाकडे आलेल्या तक्रारीवरून त्यांनी भिवंडी शहरातील खाडीपार खोणी परिसरात मुदतबाह्य खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या विरोधात कारवाई करत पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. निलेश पटेल,मिसबाउल फेजुल हक व सोनू यांनी एकता चौक,खाडीपार खोणी येथे चेडार चिज,डेरीमिल्क कॅडबरी चॉकलेट,खाण्याचे सॉसेस,बिस्कीटे,विनेगर असे परकीय भाषेत मजकूर लिहलेले अन्न पदार्थ खाण्यास अयोग्य व मानवी शरीरास अपायकारक असल्याचे माहिती असून ही विक्रीकरता ठेवले होते.

# कर्मचाऱ्यांच्या बदलीने कामकाजावर परिणाम

■ **भिवंडी**: लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार सातत्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करत आहे. त्यातच भिवंडी महापालिकेचे पाच महिन्यांपूर्वी पदभार स्वीकारलेले अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे आणि एकमेव प्रशासकीय उपायुक्त दीपक झिंझाड यांचीही बदली नुकतीच करण्यात आली आहे.त्यामुळे महापालिकेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने महापालिकेत खळबळ उडाली आहे.

लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राज्यातील प्रशासनाने अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू केली आहे.तीन वर्षांपासून एकाच ठिकाणी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा विचार केला जात आहे.परंतु नव्या नियमानुसार राज्यातील निवडणुका जिल्हा आयोगाच्या सूचनेवरून भिवंडी महापालिकेत कार्यरत अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे आणि उपायुक्त मुख्यालय दिपक झिंझाड यांची नगरविकास विभागाने बदली केली आहे. झिंजाड महापालिकेतील एकमेव प्रशासकीय उपायुक्त होते.त्यांनी सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, आस्थापना व कर आकारणी विभागाची जबाबदारी त्यांच्याकडे होती.यासह सुमारे तीन वर्षे महापालिकेत उपायुक्त पदावर असताना कामात शिस्त ठेवली होती.त्यांच्या बदलीमुळे महानगरपालिका उपायुक्तविना झाली आहे.तर पाच महिन्यांपूर्वीच अतिरिक्त आयुक्तपदावर नियुक्ती झालेले संजय हेरवाडे हे होते.त्यांनी महापालिकेत स्वच्छतेबाबत शिस्तप्रियता बाळगली.

मात्र त्यापूर्वी ते ठाणे जिल्ह्यात कार्यरत असल्याने त्यांचा जिल्ह्यातील तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांचीही बदली झाली आहे.दरम्यान महापालिकेचे अधिकारी निवडणुकीमध्ये व्यस्त आणि कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे सर्वसामान्यांना याचा फटका सहन करावा लागत आहे.

# होळीनिमित्त ठाणे पोलीस सतर्क

## चौका-चौकात मद्यपी वाहन चालकांविरोधात कारवाई होणार



■ **ठाणे** : होळी आणि धूलिवंदन निमित्ताने हुल्लडबाज वर्गाकडून फुगे फेकणे, मद्य प्राशन करून वाहन चालविणे असे प्रकार घडत असतात. या प्रकारांना आळा घालण्यासाठी ठाणे पोलिस सतर्क झाले आहेत. संपूर्ण पोलीस आयुक्तालयात मोठया प्रमाणावर बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.ठाणे वाहतूक पोलिसांकडून चौका-चौकात मद्यपी वाहन चालकांविरोधात कारवाई केली जाणार आहे.

धूलिवंदन निमित्ताने शहरातील गृहसंकुल तसेच शहरातील चौकांत कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.अनेकदा या कार्यक्रमात तरूण सहभागी झाल्यानंतर तरूण मद्यप्राशन करून बाहेर पडत असतात. दुचाकीवर नियमबाह्य पद्धतीने तिघे प्रवास प्रवास करतात. दुचाकी चालकाकडे शिरस्त्राण नसते. मोटार चालकांकडून देखील भरधाव वाहने चालवली जातात. याप्रकारामुळे इतर वाहन चालकांच्या तसेच पादचाऱ्यांच्या जीवावर देखील बेतण्याची शक्यता असते.याकरता ठाणे पोलीस सज्ज झाले आहेत. संपूर्ण ठाणे पोलीस आयुक्तालयात यनिमित्ताने चोख असा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पोलिसांकडून सातत्याने पेट्रोलिंग करण्यात येणार आहे.तसेच होळी, धुलिवंदनच्या दिवशी रेल्वेगाड्यांवर काही समाजकंटकांकडून फुगे, प्लास्टिकच्या पिशव्या फेकल्या जातात. या प्रकारामुळे रात्री गर्दीच्या वेळेत रेल्वेगाड्यांमध्ये दारात उभ्या राहणाऱ्या प्रवाशांना गंभीर दुखापत होण्याची शक्यता असते.या प्रकारांना आळा घालण्यासाठी ठाणे लोहमार्ग पोलीस सतर्क झाले आहेत.मद्य पिऊन वाहने चालविणाऱ्या वाहन चालकांविरोधात श्वास विश्लेषक यंत्राद्वारे (ब्रेथ ॲनालायझर) कारवाई करण्यात येणार आहे. वाहतूक पोलिसांकडे सध्या ४६ श्वास विश्लेषक यंत्र आहेत. तसेच दुचाकीवर तिघांचा प्रवास, विना शिरस्त्राण दुचाकी चालविणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.





■ शहरातील चौका- चौकात पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे .याबाबत बोलतांना ठाणे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ . विनयकुमार राठोड म्हणाले की ठाणे वाहतुक पोलिसांकडून शहरात होळी, धुलिवंदनाच्या दिवशी मद्य पिऊन वाहन चालविणारे, वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कारवाई केली जाणार आहे .याच जोडीला यनिमित्ताने कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलिसांकडून मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे .

# नदी संवर्धनासाठी कृती आराखडा सादर करा

## 'चला जाणूया नदीला' उपक्रमांतर्गत आयुक्तांचा पाहणी दौरा



■ **कल्याण** : जल जागृती सप्ताहानिमित्त चला जाणूया नदीला या उपक्रमांतर्गत पालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांनी जलनायक डॉ. स्नेहल दोंदे यांच्यासह कल्याण - डोंबिवली परिसरातील खाडी व नदी किनाऱ्याचा पाहणी दौरा केला. यावेळी त्यांनी नदी संवर्धनासाठी कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

या दौऱ्यादरम्यान आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांनी कल्याण पश्चिमेतील आधारवाडी बायोमायनिंग प्रकल्प, गांधारे पुलाखालील नदीची तसेच तेथे सोडण्यात आलेल्या नाल्याची पाहणी केली.त्याचप्रमाणे सांगळेवाडी येथील नाला आणि मोहने पंपिंग स्टेशन येथील उल्हास नदी पात्राचीही पाहणी करण्यात आली. आयुक्तांनी या ठिकाणांची सद्यस्थिती जाणून घेत डॉ. स्नेहल दोंदे यांनी केलेल्या निरीक्षणावर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित विभागांना दिले. डॉ. स्नेहल दोंदे यांनी नाल्याचे पाणी शुध्दीकरण प्रक्रिया करून नदीत सोडण्याकरता आवश्यक उपाययोजनांची सविस्तर माहिती उपलब्ध करून देणार असल्याचे यावेळी सांगितले.

■ तसेच नदी संवर्धनाच्या पुढील कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी पालिकेस पूर्ण सहकार्य देण्याचीही ग्वाही त्यांनी दिली. आयुक्तांनीही त्याची दखल घेत पालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना त्यावर कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले.या समयी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील,जलनिःसारण, मलनिःस्सारण विभागाचे कार्यकारी अभियंता घनःश्याम नवांगुळ, पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे,पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांच्यासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

## ठाकुर्ली परिसरात पथदिवे बसवा!

■ **डोंबिवली**: ठाकुर्ली पश्चिमेला ५२ चाळ या रेल्वेच्या परिसरातून रहदारीचे रस्ते गेले आहेत .रेल्वे विभागाने रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण केले आहे .मात्र या भागातील रस्त्यांवर लावण्यात आलेल्या पथदिव्यांची संख्या अपूरी आहे .अनेक ठिकाणी दिव्यांची व्यवस्थाच नाही .त्यामुळे त्या परिसरात गुन्हेगारी प्रकार घडण्याची शक्यता असल्याने पुरेशा प्रमाणात रस्त्याच्या दुतर्फा पथदिवे लावण्याची मागणी, मनसेचे डोंबिवली शहर संघटक म्हात्रे यांनी रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांच्याकडे केली आहे.

## मीटर रूमला आग

■ **मुंब्रा** : मुंब्रा येथील शिवाजी नगरमधील अमन हाईटस या पाच मजली इमारतीच्या मीटर रुममध्ये मध्यरात्री पावणे दोन वाजण्याच्या सुमारास आग लागली. त्यामुळे परिसरात गोंधळाचे वातावरण पसरले.

# 'हर्बल, इकोफ्रेंडली रंगांच्या नावाखाली फसवणूक'

■ **ठाणे** : अवघ्या काही दिवसांवर रंगांची मुक्त उधळण करणारा होळी , रंगपंचमी सण आला आहे . त्यासाठी बाजारांमध्ये विविध रंग विक्रीस आले आहेत . कच्च्या रंगामध्ये असलेल्या केमिकलमुळे उदभवणाऱ्या विविध समस्यांमुळे रंग विक्रेत्यांकडे हर्बल रंग ,इकोफ्रेंडली रंग अशा लेबलखाली रंग विक्रीस आले आहेत . मात्र ते रंग पर्यावरणपूरक नसल्याचा दावा पर्यावरणप्रेमींकडून करण्यात आला आहे . सण, उत्सव हे पर्यावरणस्नेही व्हावेत, यासाठी विविध पर्यावरणप्रेमी संस्था, अभ्यासक, तज्ज्ञ जनजागृती करत असले तरी होळीच्या निमित्ताने बाजारात येणारे रंग हे नैसर्गिक नव्हे, तर रासायनिक रंग असल्याचे दिसून येत आहे.ग्राहकांना फसविले जात असल्याचे पर्यावरण अभ्यासकांचे म्हणणे आहे. आजच्या काळात धुळवडीचे स्वरूप बदलून गेले आहे.नैसर्गिक रंगांची जागा रासायनिक प्रक्रियेने तयार केलेल्या रंगांनी घेतली. त्यामुळे रंगपंचमीचा उत्साहाचा बेरंग होतो. **पर्यावरणप्रेमींनी दिलेल्या माहितीनुसार पिवळा रंग**: पिवळ्या झेंडूचे फूल आणि हळद , गुलाबी रंग : गुलाबी कांद्याचे साल , बीट नारिंगी रंग : नारंगी झेंडूचे फुल, बिक्साचे बी, पारिजातक देठ, वनपुष्पाची ज्योत, जांभळा रंग -जामुनच्या बिया,जांभळा अष्टर, सोनेरी रंग : सोनेरी रंगाच्या पळसाचे वाळवलेले फुल , लाल रंग : बीटरूट, लाल हिबिस्कस फ्लॉवर, टोमॅटो, लाल चंदन, डाळिंब, हिरवा रंग : पालक, कोथिंबीर, पुदिन्याचे पान, तपकिरी रंग : तपकिरी झेंडूचे फूल , पांढरा रंग : कॉर्नफ्लोर, तांदळाच्या पीठापासून तयार करण्यात येतात.अशाच नैसर्गिक रंगांचा वापर करून होळी धूलिवंदन व रंगपंचमी साजरी करता यावी यासाठी पर्यावरण दक्षता मंडळच्या पर्यावरण शाळेच्या अंतर्गत वतीने ठाणे शहरात ३० तर मुंबईत ५ विविध शाळांमध्ये नैसर्गिक रंग बनवण्याची कार्यशाळा घेतल्या.

◆या कार्यशाळांना अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला . ठाण्यातील श्रीरंग विद्यालय , होली क्रॉस , ठामपा शाळा क्र - २९ , ठामपा शाळा क्र - ६९ , भगवती विद्यालय या शाळांमध्ये या कार्यशाळेला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला .यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी आम्ही नैसर्गिक रंग वापरूनच रंगपंचमी साजरी करणार असल्याचे सांगितले.

◆त्याचप्रमाणे यंदा या कार्यशाळेत शिक्षकांनी देखील सहभाग घेतला . डोंबिवली आणि ठाण्यात शिक्षकांसाठी कार्यशाळा देखील घेण्यात आली . या कार्यशाळेमुळे नैसर्गिक रंगांचे महत्व विद्यार्थ्यांना पटत आहे . त्याचा सकारात्मक बदल निश्चित दिसून येत आहे, अशी माहिती पर्यावरण दक्षता मंडळच्या पर्यावरण शाळेच्या प्रमुख पौर्णिमा शिरगांवकर यांनी दैनिक पुण्यनगरी शी बोलताना दिली.

